कृषीवल
रायगड, बुधवार, दि. ६ नोव्हेंबर २०२४
किंमत ४ ₹

## ट्रम्प-हॅरिस यांना समान मते

**नवी दिल्ली :** अमेरिकेत अध्यक्षपदाच्या निवडीसाठी मतदान पार पडत आहे. रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार व अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार व विद्यमान उपाध्यक्षा कमला हॅरिस यांच्यात राष्ट्राध्यक्षपदासाठी थेट लढत पहायला मिळत आहे. आधी जो बायडेन यांच्याशी ट्रम्प यांचा थेट सामना होणार होता. पण, ऐनवेळी बायडेन यांच्या माघारीमुळे कमला हॅरिस यांना उमेदवारी देण्यात आली. भारतीय वंशाच्या कमला हॅरीस व डोनाल्ड ट्रम्प या दोघांनाही अध्यक्षीय निवडणुकीसाठीच्या जनमत चाचणीमध्ये जवळपास समसमान विजयाची संधी असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला होता. त्यामुळे आजचं मतदान व त्यानंतरचे निकाल याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे.

## २५ नोव्हेंबरपासून हिवाळी अधिवेशन

**नवी दिल्ली :** संसदेचे हिवाळी अधिवेशन सोमवार २५ नोव्हेंबरपासून सुरू होत आहे. भारत सरकारच्या शिफारशीनुसार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांना बोलावण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी मंगळवारी (दि.५) दिली. संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान लोकसभा, राज्यसभा या दोन्ही सभागृहाचे कामकाज शुक्रवार २० डिसेंबर २०२४ पर्यंत चालेल. दरम्यान, २६ नोव्हेंबर रोजी संविधान स्वीकारल्याच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त साजरा केला जाणारा संविधान दिनाचा कार्यक्रम संविधान सदनच्या सेंट्रल हॉलमध्ये साजरा केला जाईल, असेदेखील रिजिजू यांनी म्हटले आहे.

# तटकरेंच्या ‘डीएनए’त गद्दारी

## शिवसेनेचे महेंद्र थोरवे यांचा घणाघात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**सुनील तटकरे हे महायुतीला लागलेला कॅन्सर असून, तटकरे हेच कर्जतमधील अपक्ष उमेदवाराच्या पाठीशी आहेत. गद्दारी ही तटकरे यांच्या डीएनएत असून, ते महायुती बसवायचे काम करीत आहेत, असा घणाघाती आरोप महायुतीचेच उमेदवार महेंद्र थोरवे यांनी केला आहे. कर्जत येथे मंगळवारी (दि.५) झालेल्या पत्रकार परिषदेत थोरवेंनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. यावेळी तटकरेंना नासका कांदा अशी उपमा देत, नासक्या कांद्याला फेकून देण्याची मागणी केली.**

यावरुन पुन्हा एकदा महायुतीतील वाद चव्हाट्यावर आला असून तटकरे नेमके कशाचे राजकारण करणार याबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. परिणामी, तटकरेंनी •> पान २ वर




### गोगावले, दळवींविरोधात धक्कातंत्र

भरत गोगावलेंची राज्यात सत्तांतर करण्यात मोठी भूमिका आहे. त्यांचा पराभव करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसमधील खानविलकर यांना पाठवले असून, तेथे भरत गोगावले यांना धक्का देण्याचा प्रयत्न सुरू आहे. या माणसाने कितीही पाप करण्याचा प्रयत्न केला तरी कावळ्याच्या शापाने गाय मरत नाही. मी रणांगणात उतरलो आहे, असा इशारा थोरवेंनी दिला. दरम्यान, शिंदे गटाविरुद्ध तटकरेंच्या सुरू असलेल्या छुप्या कारस्थानांमुळे दळवींनाही नक्कीच घाम फुटला असावा.

### बॅ. अतुलेसाहेबांना राजकारणातून संपवले

कर्जतमध्ये सुधाकर घारे यांना सुनील तटकरे यांचे पाप असून, महायुतीत छेद देण्याचे काम तटकरे यांच्या माध्यमातून सुरू आहे. सदैव भ्रष्टाचार करणारे हे नेतृत्व असून, राजकीय काटा काढण्याचे काम सुनील तटकरे करीत असून, बॅरिस्टर अंतुले यांना राजकाणातून संपवण्याचे काम केल्याचे थोरवे म्हणाले.

### ...म्हणून लाडांचा घात

सुरेश लाड यांना कटकारस्थान करून बाजूला करण्याचे काम तटकरे यांनी केले. लाड यांना मंत्री करावे लागेल, त्यामुळे आपल्या मुलीला मंत्री करता येणार नाही, म्हणून लाड यांचा घात केला. सुनील तटकरे हा महायुतीला लागलेला कॅन्सर आहे, तो वेळीच हद्दपार करायला हवा, असेही महेंद्र थोरवे यांनी सुनावले.

# निष्क्रीय आमदारांवर जनता नाराज

## दळवी पुन्हा आमदार नको, अनेकांची संतप्त प्रतिक्रिया

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग-रोहा मार्गावरील रस्ता स्वखर्चाने करेन, अशी बतावणी करीत आमदार दळवी यांनी मागील निवडणुकीत मते मिळविली. परंतु, या मार्गावरील प्रवाशांची घोर निराशा आमदारांनी केली आहे. मार्गावर खडीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. धुळीमुळे श्वसनाचा त्रास होत आहे. आमदारांबाबत अनेकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. पुन्हा दळवी आमदार नको, अशी संतप्त प्रतिक्रिया जनतेतून उमटत आहे. निवडणुकीत दळवींना प्रवाशांच्या त्रासाचा फटका बसणार असल्याची चर्चा गावपातळीवर होत आहे.




अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्यासाठी निधी मंजूर करून आणला, हे मागील दोन वर्षांपूर्वी झालेल्या खानाव येथील सभेमध्ये शेकापचे नेते जयंत पाटील यांनी पुराव्यासहीत दाखवून दिले होते. तरीदेखील त्या रस्त्याचे श्रेय आमदार दळवींनी घेत अनेकवेळा नारळफोडीचा •> पान २ वर

> अलिबाग-रोहा रस्त्याचे काम स्वखर्चाने करेन, असे आश्वासन मागील विधानसभा निवडणुकीपूर्वी आमदारांनी मते मिळविण्यासाठी दिले होते. परंतु, आजही या मार्गावरील प्रवासी खड्ड्यांतून प्रवास करीत आहेत. प्रवाशांना खूप त्रास होत आहे. आमदार दळवी यांनी घोर निराशा केली आहे. प्रवासी जीव मुठीत घेऊन या मार्गावरून प्रवास करीत आहेत.
> – मधुकर ढेबे, माजी सरपंच



(छायाचित्र- समीर मालोदे)

# महानमधील डोंगरकोळी समाज शेकापमध्ये

## चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते जल्लोषात स्वागत



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून रामराज परिसरातील महान येथील डोंगरकोळी समाजातील असंख्य तरुण मंडळी, ग्रामस्थ व महिलांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. महाविकास आघाडी पुरस्कृत, शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते सोमवारी सायंकाळी कार्यकर्त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

यावेळी शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील, विक्रांत वार्डे, रामराज परिसरातील शेकापचे पदाधिकारी व कार्यकर्ते, महिला, तरुण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. •> पान २ वर

# अलिबाग काँग्रेस चिऊताईंच्या पाठीशी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना अलिबाग तालुका काँग्रेस कमिटीने पाठिंबा जाहीर केला आहे. अलिबाग तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष भास्कर चव्हाण यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसमवेत अलिबागमध्ये झालेल्या बैठकीमध्ये ही घोषणा केली.



यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव ॲड. प्रवीण मधुकर ठाकूर, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील थळे, शहापूर काँग्रेस कमिटीचे विभागीय अध्यक्ष ॲड. प्रफुल्ल पाटील, अलिबाग शहर अध्यक्ष समीर उर्फ हुनी ठाकूर, प्रभाकर राणे, मुळे उपसरंच प्रसाद थळे, जगदीश कवळे, सुदेश समेळ, भास्कर भोपी व जयेंद्रथ पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

अलिबाग विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई उभ्या राहिल्या आहेत. त्यांना तमाम जनतेने भरघोस मतांनी निवडून देऊन विजयी करावे, असे आवाहन भास्कर चव्हाण यांनी केले. ते म्हणाले, चित्रलेखा पाटील यांना अलिबाग तालुका काँग्रेसमार्फत पाठिंबा देण्यात आला आहे.

काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी त्या पद्धतीने कामाला लागून चित्रलेखा पाटील यांना बहुमतांनी निवडून आणावे, असे आवाहनही चव्हाण यांनी केले. दरम्यान, काँग्रेसच्या पाठिंब्याने चित्रलेखा पाटील यांच्या विजयाचा मार्ग सुकर झाला आहे.

# मीच महाविकास आघाडीचा अधिकृत उमेदवार : अतुल म्हात्रे

**। पेण । प्रतिनिधी ।**

महाविकास आघाडीचा अधिकृत उमेदवार मीच आहे, असे शेतकरी कामगार पक्षाचे पेण विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार अतुल म्हात्रे यांनी सांगितले. शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यालयात मंगळवारी (दि. ६) आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार आणि शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीदेखील माझेच नाव महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून जाहीर केले आहे. त्यामुळे इतर कुणी स्वतःला महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून संबोधत असेल, तर ते धूळफेक करत आहेत.

दरम्यान, अतुल म्हात्रे यांनी महायुतीचे उमेदवार रविशेठ पाटील



यांचा खरपूस समाचार घेत निष्क्रिय लोकप्रतिनिधी असा उल्लेख केला. दोन वेळा आमदार, मंत्री अशी महत्त्वाची पदे घेऊनही पेण मतदारसंघाचा विकास करता आला नसल्याने जोरदार हल्ला चढविला. तर शिवसेनेचे उमेदवार प्रसाद भोईर यांना आज इथे, उद्या तिथे उड्या मारणारा माणूस असल्याचादेखील त्यांनी उल्लेख केला. महत्त्वाची बाब म्हणजे, कालपर्यंत भाजपा, नंतर अपक्ष आणि एकाएकी शिवबंधन अशाप्रकारे प्रवास करणारा, ध्येयधोरण नसणारा व्यक्ती मतदारसंघाचा •> पान २ वर

### वेधक

## तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील कोस्ते आदिवासीवाडी येथील एका २५ वर्षीय वयाच्या तरुणीने कोणत्यातरी अज्ञात कारणास्तव गळफास घेऊन आत्महत्या केली. सदरची घटना सोमवारी (दि.४) रात्री ११ वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेची खबर गोपाळ बारक्या जाधव (५२) रा. कोस्ते आदिवासीवाडी, ता. माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.या घटनेबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून •> पान २ वर

# रायगडात धडाडणार बड्या नेत्यांच्या तोफा

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

रायगडात सात विधानसभा मतदारसंघ असून, सर्वच पक्षांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पवार गटाचे सर्वेसर्वा शरद पवार महाविकास आघाडीचे उमेदवार अनिल नवगणे यांच्या प्रचारार्थ दि. १३ नोव्हेंबर रोजी श्रीवर्धनमध्ये येणार आहेत. तर, दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी दि. १४ नोव्हेंबरला खारघरमध्ये येणार आहेत. या दिग्गज नेत्यांच्या प्रचाराच्या तोफा धडाडणार आहेत.



**१३ ला शदर पवार श्रीवर्धनमध्ये, तर पंतप्रधान १४ ला खारघरमध्ये**

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार अनिल नवगणे यांच्या प्रचारार्थ १३ नोव्हेंबर रोजी म्हसळा शहरात सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेच्या माध्यमातून श्रीवर्धन मतदार संघात निवडणुकीचे रणशिंग फुंकले जाणार आहे. या सभेला राष्ट्रवादी अध्यक्ष शरद पवार आणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.अशी माहिती राष्ट्रवादी पक्षाचे तालुका अध्यक्ष अजहर धनसे यांनी दिली आहे. महाविकास आघाडीतर्फे श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाला जागा सुटली असून, महाविकास आघाडीतर्फे अनिल नवगणे यांना उमेदवारी मिळाली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी १४ नोव्हेंबरला खारघरमध्ये येणार असून, पनवेल, नवी मुंबई आणि उरणमधील •> पान २ वर

# महासंचालकपदी संजय कुमार

**मुंबई :** निवडणूक आयोगाने मंगळवारी (दि.५) महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालकपदी संजय कुमार वर्मा यांची नियुक्ती केली. संजय कुमार वर्मा हे १९९०च्या आयपीएस बॅचचे अधिकारी आहेत. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांपूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाने सोमवारी (दि.४) राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली केली आहे. काँग्रेस आणि इतर पक्षांच्या तक्रारींवरून केंद्रीय निवडणूक आयोगाने शुक्ला यांच्या बदलीचे आदेश दिल्याचे केंद्रीय आयोगाने स्पष्ट केले होते.

# मतदान यंत्रांची दुसरी सरमिसळ

**रायगड :** अलिबाग विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी सामान्य निवडणूक निरीक्षक रुही खान यांच्या उपस्थितीत मतदान यंत्राची दुसरी सरमिसळ (रँडमायझेशन) प्रक्रिया मंगळवारी करण्यात आली. अलिबाग निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात आयोजित या बैठकीस जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक •> पान २ वर




## आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी दिले आशीर्वाद

# कृषीवल दिवाळी अंकाचे प्रकाशन

**। चौल । प्रतिनिधी ।**

ज्येष्ठ निरुपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या हस्ते कृषीवलच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन मंगळवारी (दि. ५) रेवदंडा येथील निवासस्थानी झाले. कृषीवल दिवाळी अंकाचे आप्पासाहेबांनी तोंडभरुन कौतुक करुन संपूर्ण कृषीवल परिवाराला आशीर्वाद देत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या. कृषीवल दिवाळी अंक दरवर्षी मी आवर्जून वाचतो, असेही यावेळी त्यांनी सांगितले. दरम्यान, अलिबागची कोळीणबाय अर्थातच आपल्या खाद्यपदार्थांची चव जगभरातील खवय्यांना सोशल मीडियाच्या माध्यमातून चाखायला लावणाऱ्यानलिनीकाकूंच्याहस्तेही त्यांच्या थेरोंडा-आगल्याची वाडी येथील निवासस्थानी प्रकाशन झाले.




दिवाळी म्हटली की लाडू, करंजीचा फराळ येतोच. पण, दिवाळी अंकाच्या रुपाने साहित्यिक फराळही घरोघरी फस्त केला जातो. दिवाळी अंकांच्या भाऊगर्दीत दैनिक कृषीवलचा अंक वेगळेपण जपणारा असतो. कला, संस्कृती आणि वैचारिक साहित्याने परिपूर्ण ठरलेल्या या दिवाळी अंकाने वाचकांच्या हृदयात स्थान मिळवलेले आहे. याच परंपरेतून यंदाचा दिवाळी अंक मनोरंजनासह भरपूर वैचारिक खाद्य देणारा, वाचकांची •> पान २ वर

### विशेष आकर्षण

**अलिबागची कोळीणबाय नलिनीकाकू यांच्या रेसिपीज् खास वाचकांसाठी दिल्या असून, हेच दिवाळी अंकाचे विशेष आकर्षण आहे. नलिनीकाकू यांचे सोशल मीडियावर लाखोंच्या संख्येत चाहते आहेत. त्यांचे घरगुती मसाले आणि विविध प्रकारच्या आगरी-कोळी पद्धतीच्या खाद्यपदार्थांनी जगभरातील खवय्यांना भुरळ घातली आहे.**


● (छायाचित्र : सुरेश खडपे)

# राज्यात ८५ वर्षांचे १२ लाखांपेक्षा जास्त मतदार

**। मुंबई । दिलीप जाधव ।**

राज्यात येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभेसाठी निवडणूक होत आहे. या निवडणुकीत ८५ वर्षांहून अधिक वयोगटामधील एकूण १२ लाख ४० हजार ९१९ मतदार असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस. चोकलिंगम यांनी मंगळवारह (दि. ५) मंत्रालयात झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

निवडणूकभयमुक्तवातावरणात पार पडली जावी, याकरिता पोलीस यंत्रणा तसेच जिल्हाधिकारी यांना योग्य त्या सूचना देण्यात आल्या असून, अप्रिय घटना घडल्यास त्वरित कारवाई करण्यात येईल. लोकसभा निवडणुकीत पेड न्यूजच्या १० घटनांविरुद्ध तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यावर चौकशी सुरु आहे.



राज्यात एकूण ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार असून, यामध्ये ८५ वर्षांवरील मतदारांची संख्या १२ लाखांहून अधिक आहे. या वयोगटात एकूण १२ लाख ४० हजार ९१९ मतदार आहेत. विशेष म्हणजे, पुरुषांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या अधिक आहे. ५ लाख ४२ हजार ८९१ पुरुष मतदार, तर ६ लाख ९८ हजार २२ महिला मतदार आणि ६ तृतीयपंथी मतदार आहेत.

पुणे जिल्ह्यात ८५ वर्षांवरील वयोगटात सर्वाधिक १ लाख २१ हजार ७६० मतदार आहेत. ज्यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ५९ हजार २९७ तर महिला ६२ हजार ४६० आणि ३ तृतीयपंथी मतदार आहेत. मुंबई उपनगर जिल्ह्यातील ९२ हजार ८७५ मतदारांमध्ये ४८ हजार २९२ पुरुष तर ४४ हजार ५८३ महिला मतदार आहेत. नाशिक जिल्ह्यामध्ये ८५ वर्षांवरील मतदारांची संख्या ६० हजार २७८ इतकी असून, यामध्ये २५ हजार ४२९ पुरुष आणि ३४ हजार ८४९ महिला मतदार आहेत. ८५ वर्षांवरील सर्वात कमी मतदार गडचिरोली जिल्ह्यात असून, येथील एकूण ६ हजार ६१३ मतदारांमध्ये २ हजार ५५७ पुरुष तर ४ हजार ५६ महिला मतदार आहेत.

राज्यात ८५ वर्षांवरील तृतीयपंथी मतदारांची एकूण संख्या ६ असून यामध्ये ३ मतदार पुणे जिल्ह्यात आणि मुंबई शहर, सातारा तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रत्येकी एक मतदार असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस. चोक लिंगम यांनी पत्रकारांना दिली. यावेळी अतिरिक्त निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी आणि अतिरिक्त निवडणूक अधिकारी पी. प्रदीप उपस्थित होते.



# ब्राह्मण संघाकडून दिवाळी पहाट कार्यक्रम

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी ब्राह्मण संघाने दिवाळी पहाट हा भक्तीगीत, नाट्यगीत, शास्त्रीय संगीत यावर आधारित कार्यक्रमाचे आयोजन मोहोपाडा येथील श्रीगणेश मंदिराच्या सभागृहात करण्यात आले होते. एकूण तीन तास चाललेल्या या कार्यक्रमात स्थानिक कलाकार व बाहेरून आलेले कलाकारांनी मिळून गाणी सादर केली. दिवाळी पहाट साजरा करण्याचे हे दुसरे वर्ष आहे. यावेळी मोठ्या उपस्थित राहिलेल्या रसिकश्रोत्यांसहित कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संघाच्या सदस्यांनी खूप मेहनत घेतली. यावेळी रसायनी संघाचे संस्थापक हे डॉ. विलास कुलकर्णी, अध्यक्ष म्हणून बी.एस. कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. रसायनी ब्राह्मण संघाचे गायक वृंद शकुन आपटे, विष्णू जोगळेकर, गौरी बागुल, अदिती नगरकर, आंचल रावत, साथसंगत : तबला - राकेश कुलकर्णी, संवादिनी - ऋतुजा कर्वे कुंटे, की बोर्डची साहिल सोमण, टाळ- दीपक पुंडले, आणि निवेदिका - संध्या कुलकर्णी यांनी केले.

# प्रीतम म्हात्रेंच्या गावदौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। शिरढोण । वार्ताहर ।**

उरण विधानसभा मतदारसंघामध्ये लाल बावटा फडकवून उरणमधील विजयाची माजी आमदार विवेक पाटील यांना भेट देणार आहे, असे उद्गार उरण विधानसभा मतदारसंघाचे शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांनी काढले. प्रीतम म्हात्रे यांच्या गावभेटी सुरू असून, नुकतीच त्यांनी शिरढोण गावाला भेट देऊन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांना अभिवादन केले.



या वेळी पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांचे बंधू विजय म्हात्रे, माजी आमदार विवेक पाटील यांचे बंधू हेमंत पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण घरत, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती राम भोईर, पंचायत समितीचे माजी उपसभापती सुभाष पाटील, संतोष पाटील, विभागीय चिटणीस नाना मोरे, शिरढोणच्या सरपंच वैशाली भोईर, माजी सरपंच पांडुरंग मुकादम, कांचन मुकादम, मोहन पवार, वाहतूक सेलचे पनवेल तालुका अध्यक्ष सागर भोईर, व्यापारी सेलचे विभागीय अध्यक्ष संग्राम भोपी, भरत भोईर, वासुदेव कर्णेकर, ऋषिकेश भोईर, भारत मुकादम, जगदीश मुकादम, भूषण म्हात्रे, योगेश मुकादम यांच्यासह शेकाप कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

शेतकरी कामगार पक्षातील ज्येष्ठांनी माझ्यासारख्या तरुणाला विधानसभेची निवडणूक लढवण्याची संधी दिल्याबद्दल प्रीतम म्हात्रे यांनी आभार मानले.

युवा कार्यकर्ते पक्षाकडे आकर्षित होत असल्याचेही त्यांनी सांगितले. उरण विधानसभा मतदारसंघामध्ये भाजपामुळे अनेक विकासकामे रखडली असून, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचा वाडा व या विभागातील इतर कामे शेतकरी कामगार पक्षांमुळेच झाली आहेत, असे प्रीतम म्हात्रे म्हणाले.

# 'खासगी मालमत्ता सामूहिक मालत्तेचा भाग नाही'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि. ५) खासगी मालमत्तांच्या अधिग्रहणाबाबत महत्त्वपूर्ण निर्णय दिला. घटनेच्या कलम ३९ (बी) अंतर्गत प्रत्येक खासगी मालमत्तेला सामूहिक मालमत्तेचा भाग मानता येणार नाही, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने स्पष्ट केले आहे.

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील नऊपैकी सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाने आपल्या निकालात स्पष्ट केले आहे की, खासगी मालमत्ता ही समाजाच्या भौतिक संसाधनांचा भाग असू शकते; परंतु एखाद्या व्यक्तीच्या मालकीची प्रत्येक मालमत्ता समाजाच्या भौतिक संसाधनांचा भाग बनली पाहिजेत असे नाही. या निर्णलासह सर्वोच्च न्यायालयाने न्यायमूर्ती कृष्णा अय्यर यांचा १९७८ चा निर्णय रद्द केला, ज्यामध्ये म्हटले होते की, सरकार सर्व खासगी मालमत्ता सामान्य फायद्यासाठी घेऊ शकते. सात न्यायमूर्तींच्या बहुमताने दिलेल्या निर्णयात म्हटले आहे की, सरकार खासगी मालमत्ता ताब्यात घेऊ शकते, असा जुना निर्णय विशेष आर्थिक, समाजवादी विचारसरणीने प्रेरित होता. तथापि, सध्याच्या नियमानुसार, सर्व खासगी मालकीची संसाधने यापुढे सरकार अधिग्रहित करू शकत नाहीत. सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायाधीशांच्या खंडपीठातील दोन न्यायाधीशांचा निर्णय वेगळा राहिला. न्यायमूर्ती बी.व्ही. नागरथना यांनी खंडपीठाच्या निर्णयावर अंशत: असहमती दर्शवली.

# प्रीतम म्हात्रे यांची प्रचारात आघाडी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते व पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी प्रचारात चांगलीच आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात प्रामुख्याने तरुणवर्ग शेकापच्या शिट्टीचा प्रचार मोठ्या प्रमाणात करत असल्याने प्रीतम म्हात्रे यांचा विजय निश्चितच मानला जात आहे.

उरण मतदार संघातील प्रामुख्याने ग्रामीण भाग व त्यामध्ये शेकापक्षाची ताकद मोठ्या प्रमाणात असणाऱ्या तारा, बारापाडा, डोलघर, शिरढोण आदी भागात आज प्रचार करताना मोठ्या प्रमाणात तरुण वर्गासह ज्येष्ठ नागरिक सुद्धा प्रचारात सहभागी झाले होते व परिसर शिट्टीने दुमदुमून गेला होता. प्रितम म्हात्रे यांनी थोरामोठ्यांचे आशिर्वाद घेत घराघरात जाऊन आपल्याला मतदान करावे, असे मतदार राजाला आवाहन केले. या आवाहनाला ग्रामस्थांनीसुद्धा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



शेकापक्षाच्या माध्यमातून या परिसरात करण्यात आलेली विकासकामे तसेच प्रितम म्हात्रे यांचे पिताश्री जे.एम. म्हात्रे यांनी केलेली वेळोवेळी गोरगरीबांना मदत याची आठवण आजही ग्रामीण भागामध्ये तेथील रहिवासी काढत आहेत. त्यामुळे याची परतफेड प्रीतम म्हात्रे यांना विजयी करून करणार असल्याच्या भावनासुद्धा या नागरिकांमध्ये आहेत.

पान १ वरून

## तटकरेंच्या 'डीएनए'त गद्दारी

बंडखोरीची भूमिका घेतल्याने शिंदे गटाचे तीनही उमेदवार तणावाखाली आले आहेत.

पोसरी येथील शिवतीर्थ सभागृहात महायुतीचे उमेदवार आणि विद्यमान आमदार महेंद्र थोरवे यांनी पत्रकार परिषद घेऊन आपल्या प्रचाराची माहिती दिली. त्यावेळी महेंद्र थोरवे यांच्यासह शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष भोईर, जिल्हा संघटक संभाजी जगताप, जिल्हा उपप्रमुख भाई गायकर, तालुका प्रमुख सुदाम पवाळी, विधानसभा संघटक शिवराम बदे, मतदारसंघ संपर्क प्रमुख पंकज पाटील आदी उपस्थित होते. महायुतीमध्ये सुरू असलेल्या गोंधळाबद्दल जाहीर भूमिका मांडण्यासाठी ही पत्रकार परिषद घेतल्याचे सुरुवातीला त्यांनी स्पष्ट केले. मतदारसंघात महायुतीचे तिन्ही नेत्यांनी एकत्र बसून निर्णय घेतले आणि कर्जतमध्ये मला उमेदवारी मिळाली. कर्जत मतदारसंघात आज महायुतीचा घटक पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस आणि त्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचा कार्यकर्ता यांना माझ्यासमोर उभा करण्याचा निर्णय घेतला आहे. महायुतीमध्ये बंडखोरी होत होती, ती रोखण्याचे काम झाले नाही. सुनील तटकरे यांनी ते जाणीवपूर्वक केल्याचा आरोप थोरवेंनी केला. तटकरे जबाबदार नेते असून, त्यांच्या माध्यमातून कर्जतमध्ये उमेदवार दिला आहे. तटकरे महायुतीचा भाग असतानादेखील त्यांनी कर्जत मतदारसंघात बंडखोरी करायला लावले आहे. राज्यात महायुतीचे नेते महत्त्वाचे योगदान देत आहेत. पण, कर्जतमध्ये महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे युतीधर्म पाळत नाहीत, असा आरोप थोरवेंनी केला. मी बाळासाहेब ठाकरे यांचा शिवसैनिक असून, मी सुनील तटकरे यांना त्यांची जागा दाखवून दिली. मलादेखील तटकरे यांनी पालकमंत्री उदय सामंत यांच्यासमोर आश्वासन दिले होते की, सुधाकर घारे यांचा उमेदवारी अर्ज नसेल. परंतु, सुनील तटकरे हे सुधाकर घारे हा माझा उमेदवार आहे, असे सांगून प्रचार करीत आहेत.

सुधाकर घारे राजीनामा देऊन निवडणुकीला सामोरे जात आहेत. सुनील तटकरे यांचा आशीर्वाद असल्याने त्यांच्यावर हकालपट्टीची कारवाई झाली नाही. सुनील तटकरे यांचा डीएनए तपासला तर गद्दार असाच येईल आणि त्यांचा दोन्ही उमेदवारांचा डीएनए तपासला तर तेदेखील गद्दार असाच येईल. मी त्यांना भीक घालणार नाही, असा निर्धार महेंद्र थोरवे यांनी व्यक्त केला. किरण ठाकरे यांनीदेखील पक्षांचे आदेश पाळून अर्ज मागे घेतला, असेही त्यांनी सांगितले.

## निष्क्रीय आमदारांवर जनता नाराज

कार्यक्रम राबविला. बेलकडे स्थानकाजवळ शासकीय कार्यक्रमही घेतला. गेल्या पाच वर्षांत आमदार नारळ फोडण्यात मग्न राहिले. प्रत्यक्षात रस्त्याचे काम सुरू झाले नाही. भाजपचे जिल्हा माजी उपाध्यक्ष दिलीप भोईर यांनी रस्त्याचे काम सुरु करण्यासाठी बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या सहीचे पत्र आणून अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याचे काम मागील २०२३ मध्ये गुढीपाडव्याच्या दिवशी सुरु केले.

दुसऱ्या दिवशी शिंदे गटातील आमदार दळवी यांच्या समर्थकांनी पुन्हा बेलकडे येथे नारळफोडीचा कार्यक्रम घेत रस्त्यावरून श्रेयवाद मिळविण्यास सुरुवात केली. त्यामुळे दळवी विरुद्ध भोईर यांचा श्रेयवाद चांगलाच पेटला. या वादामध्ये अजूनपर्यंत अलिबाग-रोहा मार्गावरील रस्ता खड्ड्यातच आहे. पहिला ठेकेदार अर्धवट काम टाकून पळून गेला. दुसऱ्या ठेकेदाराकडे काम सोपविण्यात आले आहे. वेलवली-खानाव ते गेल कंपनीपर्यंत अपूर्ण केलेले काँक्रिटीकरणामुळे वाहनचालकांना प्रचंड त्रास होत आहे. दोन वर्षांपूर्वी अपूर्ण केलेले काँक्रिटीकरण आता खराब होण्याच्या मार्गावर आहे. त्याच काँक्रिट रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला जेएसडब्ल्यू कंपनीमधील कच्चा माल टाकला आहे. त्याचे कण चालकांसह प्रवाशांच्या नाका-तोंडात जाऊ लागले आहेत. नांगरवाडी ते तळवली या चढणीवरच्या रस्त्यावर खडी पसरली आहे. रस्त्याच्या दुतर्फा असलेली संरक्षक भिंत तोडण्यात आली आहे. वाहनचालकांचा वाहनांवरील ताबा सुटल्यास वाहने दरीत कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. वाहन चालविताना चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. जीव मुठीत घेऊन प्रवाशांना प्रवास करावा लागत आहे. मागील निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करण्यास आमदार अपयशी ठरल्याने अनेकांनी त्यांच्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. यावेळी दळवी आमदार नको, अशी संतप्त प्रतिक्रिया अनेक गावागावांतून उमटत आहेत.

## मीच महाविकास आघाडीचा अधिकृत उमेदवार : अतुल म्हात्रे

विकास कसा करेल, असाही प्रश्न उपस्थित केला. पुढे त्यांनी प्रसाद भोईर हे महायुतीच्या बी टीमचे सदस्य असल्याचेदेखील सांगितले. भविष्यात या मतदारसंघाचा विकास करण्यासाठी महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून मी कटिबद्ध असणार आहे. या मतदारसंघात पर्यावरणपूरक पर्यटन रोजगार उपलब्ध करुन देणार असून, येथील स्थानिकांना उद्योजक बनविण्याचा माझा मानस असल्याचे म्हात्रे म्हणाले. येत्या काही दिवसात जाहीरनाम्याच्या रुपाने आपण सगळ्या योजना मतदारांपुढे मांडणार आहोत, असेही ते म्हणाले. या पत्रकार परिषदेसाठी पेण तालुका चिटणीस महादेव दिवेकर, निलेश म्हात्रे, प्रल्हाद पाटील, दिपक पाटील आदी मान्यवरांसह शेकापचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## मतदान यंत्रांची दुसरी सरमिसळ

सोमनाथ घार्गे, निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश चव्हाण यांसह विविध उमेदवार यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. निवडणूक निरीक्षक रुही खान (सामान्य) यांनी उपस्थितांना अलिबाग विधानसभा मतदारसंघातील सरमिसळ प्रक्रिया संदर्भात माहिती दिली. १९२ अलिबाग विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण ३७५ मतदान केंद्र असून, याकरिता ४५० बॅलेट युनिट, ४५० कंट्रोल युनिट, तर ४८७ व्हीव्हीपॅटचे वाटप करण्यात आले आहे. मंगळवारी या मशीनचे सर्व मतदान केंद्रांना वाटप करण्यात आले.

## रायगडात धडाडणार बड्या नेत्यांच्या तोफा

महायुतीच्या उमेदवारांसाठी सभा घेणार असल्याची माहिती विधान परिषदेचे भाजपा आमदार विक्रांत पाटील यांनी दिली आहे. आमदार पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ तारखेचा सभेचा कार्यक्रम ठरला असून, खारघर मधील कोणत्या मैदानावर ही सभा होणार हे अद्यापही ठरायचं आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गट आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीविरोधात भाजपा, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांची महायुती अशी लढत रंगणार असल्याने सर्वच पक्षातील प्रमुख नेते मैदानात उतरले असून, आपापल्या पक्षातील उमेदवार विजयी व्हावा या दृष्टीने स्टार प्रचारकांच्या सभांचे आयोजन करण्यात आले आहे.

## महानमधील डोंगरकोळी समाज शेकापमध्ये

शेतकरी कामगार पक्षच विकास करू शकतो. गावांचा विकास हा शेकापच्या माध्यमातून होऊ शकतो, हा विश्वास ठेवत महान येथील डोंगरकोळी समाजातील दोनशेहून अधिक कार्यकर्ते शेतकरी कामगार पक्षात सामील झाले आहेत. प्रवेशकर्त्यांमध्ये महिलांचीही मोठा सहभाग होता. चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना मताधिक्क्यांनी निवडून द्यावे, असे आवाहन शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील यांनी केले. त्या आवाहनाला प्रतिसाद देत या निवडणुकीत चित्रलेखा पाटील यांना बहुमतांनी निवडून देण्याचा निर्धार उपस्थितांनी केला. दरम्यान, चित्रलेखा पाटील यांचे महान येथे आगमन होताच त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

## तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

मिळालेली माहिती अशी की, घटनेतील मयत अनिल गोपाळ जाधव (२५) रा.कोस्ते आदिवासीवाडी, ता. माणगाव याने कोणत्यातरी अज्ञात कारणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेची खबर देणारे गोपाळ जाधव यांनी मयत यास खाली उतरवून माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात आणले असता येथील डॉक्टरांनी त्यास तपासून मयत झाल्याचे सांगितले. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असून, सदर घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार तुणतुणे हे करीत आहेत.

## कृषीवल दिवाळी अंकाचे प्रकाशन

अभिरुची समृद्ध करणारा असा आहे. कृषीवल दिवाळी अंकाचे शानदार प्रकाशन मंगळवारी आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या हस्ते पार पडले.

दिवाळी अंकाच्या प्रकाशानावेळी कृषीवलच्या कार्यकारी संपादक माधवी सावंत, व्यवस्थापक रुपेश पाटील, जाहिरात व्यवस्थापिका हर्षा नाईक-पाटील,अकाऊंटंट दर्शना पाटील, वरिष्ठ उपसंपादक राकेश लोहार, छायाचित्रकार सुरेश खडपे उपस्थित होते. यावर्षीच्या कृषीवलच्या दिवाळी अंकात अनेक मान्यवरांचे लेख आहेत. सल्लागार संपादक प्रसाद केरकर यांनी आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी असणाऱ्या धारावी झोपडपट्टी अदानीच्या घशात घालण्याचा डाव सत्ताधारी सरकारचा असल्याबाबत सरकारच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा लेख लिहिला आहे. रायगडची रणरागिणी मीनाक्षीताई पाटील यांच्या विधिमंडळातील कार्यावर प्रा. महेश बिऱ्हाडे यांचा अभ्यासपूर्ण लेख आहे. तर, राजकारण समाजकारण, मनोरंजन, क्रीडा आदी सर्वच क्षेत्रात वावर असणारं रायगडातील बहुआयामी व्यक्तिमत्त्व अर्थात चित्रलेखा पाटील यांच्या अफाट कार्याचा धांडोळा कार्यकारी संपादक माधवी सावंत यांनी घेतला आहे. ऑलिम्पिकमध्ये तमाम भारतीय महिलांचे प्रतिनिधीत्व करताना उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर दोन पदके पटकाविणारी मनू भाकरच्या जीवनप्रवासाबाबत विनायक दळवींनी प्रकाशझोत टाकला आहे. सध्याचा काळ निवडणुकांचा असल्याने राजकारणाविषयी विशेष परिसंवादात लेखकांनी आपले परखड मत व्यक्त केले आहे. जुन्या जमान्यापासून ते आतापर्यंतचे मराठी चित्रपटसृष्टीतील खलनायकांचे विलास फडके यांच्या लेखणीतून उतरलेले धम्माल किस्से आहेतच. रायगड जिल्ह्याच्या विकासावर लिहिताना राजकारण्यांनी आपला सात पिढ्यांचा विकास कसा केला? तसेच खरंच रायगडचा विकास झालाय का? याबाबत सहाय्यक संपादक आविष्कार देसाईंनी वाचनीय लेख लिहिला आहे. आजच्या ऑनलाइनच्या जमान्यात आठवडी बाजार ते ऑनलाइन शॉपिंग यावर सहाय्यक संपादक सुयोग आंग्रेनी अभ्यासपूर्ण मांडणी लेखाच्या माध्यमातून केली आहे.

**मनोरंजनासह भरपूर वैचारिक खाद्य..**

गुरु-शिष्यांवर भाष्य करणारे ज्येष्ठ अभिनेत्री वंदना गुप्ते, नृत्यांगणा शर्वरी जमेनिस, कवी अरुण म्हात्रे यांनी आपले विचार मनमोकळेपणाने मांडले असून, त्यांचे लेख वाचनीय झाले आहेत. विविध कथांमुळे अंकाला भारदस्तपणा आला आहे. दिग्गजांच्या कविता आहेत. विविध विषयांनी नटलेला दैनिक कृषीवलचा दिवाळीत अंक वाचकांसाठी अतिशय वाचनीय असाच आहे.

# काँग्रेस आज प्रचाराचे रणशिंग फुंकणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

काँग्रेस व महाविकास आघाडी विधानसभेच्या निवडणुकीत पूर्ण तयारीने उतरली असून, काँग्रेस पक्ष बुधवारी (दि. ६) प्रचाराचे रणशिंग फुंकणार आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे उद्या बुधवारी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत असून, नागपुरात दुपारी १ वाजता 'संविधान सन्मान संमेलनाला' उपस्थित राहणार आहेत. तर संध्याकाळी ५ वाजता मुंबईच्या वांद्रे कुर्ला संकुलातील मैदानात मविआची 'महाराष्ट्र स्वाभिमान सभा' होणार आहे. या सभेत विधानसभा निवडणुकासाठी काँग्रेस पक्षाच्या गॅरंटी जाहीर करणार आहेत, अशी माहिती प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी दिली आहे.

बीकेसीमधील सभेला काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात आदी उपस्थित राहणार आहेत.

**द नॅशनल को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : २१४, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.
वसुली विभाग : प्लॉट क्रमांक ८ सी, १ ला मजला, सेक्टर -१३, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, रायगड, ४१० २०६ इ मेल तपशील : recovery@ncbmumbai.com दूरध्वनी क्रमांक : (०२२) २७४५ ८६२८

**लिलाव विक्रीची सूचना**

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन फिनान्शिअल असेट्स अँड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत स्थावर संपत्तीच्या विक्रीकरिता लिलाव विक्री. सर्वसामान्य जनतेस आणि विशेषत: खालील निर्देशित कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनकोंकडे गहाण /प्रभारित खालील निर्देशित मालमत्ता जिचा विधायक/ प्रत्यक्ष/प्रतिकात्मक ताबा बँक/प्रतिभूत धनकोंच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे घेण्यात आला आहे त्या मालमत्तेची संबंधित कर्जदार व हमीदारांकडून बँक/प्रतिभूत धनकोंना देय थकित रकमेच्या वसुलीसाठी खालील तक्त्यामध्ये विहित तारीख व वेळेवर जशी आहे जेथे आहे तत्त्वावर व जशी आहे जी आहे तत्त्वावर विक्री करण्यात येत आहे.

| कर्जदाराचे नाव व मालमत्तेचे वर्णन | थकित रक्कम | राखीव मूल्य रु. | इसारा रक्कम रु. | परीक्षण, लिलावाची तारीख व वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. श्रीमती सुषमा के.प्रकाशे सदनिका क्रमांक १४, तिसरा मजला, त्रिमूर्ती कॉम्प्लेक्स, सर्व्हे क्रमांक ६२, ६१,६१/७०, ७, ५ ए, २/०, सीटीएस क्रमांक १६०५ आणि १६०६, प्लॉट क्रमांक ३६, मौजे चिंचवली शेकीन, तालुका खालापूर, जिल्हा रायगड, ४१० २०३, क्षेत्र ६१३ चौरस फूट बीयुए. | दि. ३१.१०.२०२४ रोजीनुसार रु. ३२,७१,५७२.०० अधिक दि. ०१.११.२०२४ पासून पुढील व्याज | रु. १८,३९,०००.०० | रु. १,८३,९००.०० | परीक्षण : दि.२२.११.२०२४ रोजी स. ११.०० ते सायं. ५.०० या वेळेत व लिलाव दिनांक : २७.११.२०२४ रोजी स. ११.३० वा. दी नॅशनल को ऑप बँक लिमिटेड, प्लॉट क्रमांक ८- सी, सेक्टर १३, १ ला मजला, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पश्चिम) नवी मुंबई, ४१० २०६. दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५ ८६२८. इ मेल : recovery@ncbmumbai.com |
| २. श्री. भूपेंद्र सिंग सोहनी व मे. दमन अ‍ॅग्रो टेक - त्यांचे प्रोप्रायटर श्री. भूपेंद्र सिंग सोहनी यांच्या माध्यमातून शॉप नं. १, तळमजला, शिवदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक क्र. ९७३, विभाग क्र. ३९, उल्हासनगर,ठाणे - ४२१ ००५, मोजमापित १५८ चौ. फूट. | दि. ३१.१०.२०२४ रोजीनुसार रु. ३५,६३,७२६.०० अधिक दि. ०१.११.२०२४ पासून पुढील व्याज | रु. १९,००,०००.०० | रु. १,९०,०००.०० | परीक्षण : दि.०७.१२.२०२४ रोजी स. ११.०० ते सायं. ५.०० या वेळेत व लिलाव दिनांक : १०.१२.२०२४ रोजी स. ११.३० वा. दी नॅशनल को ऑप बँक लिमिटेड, शॉप नं. १ ते ३ व ७ ते ९, शीतल कॉम्प्लेक्स, जुना मुंबई - पुणे लिंक रोड, काटेमानिवली, कल्याण (पूर्व), ठाणे - ४२१३०६. ई-मेल : klbrac@ncbmumbai.com |

**लिलाव ठिकाण -**

**१. श्रीमती सुषमा के. प्रकाशे - दी नॅशनल को ऑप बँक लिमिटेड,** प्लॉट क्रमांक ८- सी, सेक्टर १३, १ ला मजला, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पश्चिम) नवी मुंबई, ४१० २०६. दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५ ८६२८. ई मेल : recovery@ncbmumbai.com

**२.श्री. भूपेंद्र सिंग सोहनी व मे. दमन अ‍ॅग्रो टेक - त्यांचे प्रोप्रायटर श्री. भूपेंद्र सिंग सोहनी यांच्या माध्यमातून दी नॅशनल को ऑप बँक लिमिटेड,** शॉप नं. १ ते ३ व ७ ते ९, शीतल कॉम्प्लेक्स, जुना मुंबई - पुणे लिंक रोड, काटेमानिवली, कल्याण (पूर्व), ठाणे - ४२१३०६.
ई मेल : recovery@ncbmumbai.com

**अटी आणि शर्ती :**

१) बोली अर्ज आणि विक्रीच्या अटी आणि शर्ती बँकेच्या वसुली विभाग कार्यालय : येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते संध्याकाळी ५ या वेळेत प्राप्त करता येतील.
ए) वसुली विभाग -प्लॉट क्रमांक ८-सी, सेक्टर १३, पहिला मजला, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पश्चिम), नवी मुंबई, ४१० २०६,
दूरध्वनी -२ ७४५ ८६२८ ई मेल : recovery@ncbmumbai.com
बी) कल्याण शाखा : शॉप नं. १ ते ३ व ७ ते ९, शीतल कॉम्प्लेक्स, जुना मुंबई - पुणे लिंक रोड, काटेमानिवली, कल्याण (पूर्व), ठाणे - ४२१३०६.
ई मेल : klbrac@ncbmumbai.com
सी) घोडबंदरशाखा : शॉप नं. १३, तळमजला, हिलस्प्रिंग, विजय गार्डन, घोडबंदररोड, ठाणे -४०० ६१५, दूरध्वनी ८४२४०८१७१७/
ईमेल : gdbrac@ncbmumbai.com

२) बोलीदार यांनी या बोली प्रक्रियेत लिलावाच्या दिवशी व्यक्तिशः सहभाग घेणे आवश्यक आहे तसेच बोली सीलबंद लिफाफ्यात **श्री. भूपेंदर सिंग सोहनी व मे. दमन अ‍ॅग्रोटेक - त्यांचे प्रोप्रायटर श्री. भूपेंदरसिंग सोहनी** यांच्याकरिता नमूद केलेल्या ईएमडी रकमेसह आरटीजीएस/एनइएफटी यांच्या माध्यमातून किंवा पे ऑर्डर किंवा डीडी जो राष्ट्रीयकृत किंवा शेड्युल बँक यांचा आणि नॅशनल को ऑप बँक लिमिटेड यांच्या नावे मुंबई येथे देय असेल त्याच्या माध्यमातून अदा करणे आवश्यक आहे. सदरील सीलबंद लिफाफा **द नॅशनल को ऑप बँक लिमिटेड, वसुली विभाग कल्याणशाखा, घोडबंदर शाखा यांचे प्राधिकृत अधिकारी सौ. सुषमा क. प्रकाशे यांच्याकडे दि.२६.११.२०२४ रोजी सायं. ५.०० वा. वा तत्पूर्वीपर्यंत प्राप्त होणे आवश्यक आहे.**

३. ईएमडी शिवाय प्राप्त झालेली बोली तसेच राखीव किमतीच्या खाली असलेली बोली यांचा विचार करण्यात येणार नाही. बोलीचे सीलबंद लिफाफे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या ठिकाणी आणि वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळी उघडण्यात येतील.

४) कोणतीही व्यक्ती जी या लिलाव प्रक्रियेत व्यक्ती अथवा कॉर्पोरेट आस्थापनेच्या माध्यमातून सहभाग घेणार असेल तर त्यांनी लेखी प्राधिकार प्रपत्र/संचालक मंडळाचा ठराव सादर करणे आवश्यक आहे.

५ ) बोलीदार यांनी केवायसी प्रपत्रे उदा पॅनकार्ड/रहिवासाचा पत्ता यांच्या पुराव्याची स्वयंसाक्षांकीत प्रत, एक पासपोर्ट आकाराचे छायाचित्र बोलीसह सादर करणे आवश्यक आहे तसेच मूळ कागदपत्रे लिलावाच्या ठिकाणी आणि वेळी पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

६) मालमत्तेची विक्री **जसे आहे जिथे आहे तसेच जे आहे ते आहे तत्वावर घेण्यात येणार आहे.** आणि इच्छूक बोलीदार यांनी मालमत्तेवरील दावे, भार, कर देयके, अधिभार, अधिशुल्क आणि/किंवा मालमत्तेच्या संदर्भातील अन्य देयके यांच्या संदर्भातील स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक आहे. आणि त्या देयकाची पूर्तता संबंधित बोलीदार यांनी करणे आवश्यक आहे. सदरील मालमत्तेच्या संदर्भातील देयके आणि देयता बँकेला ज्ञात नाहीत.

७) लिलावासाठी बोली प्रक्रिया प्राधिकृत अधिकारी यांना प्राप्त झालेल्या सर्वोच्च बोलीनंतर सुरु होईल त्यानंतर बोलीदार यांना आपली बोली रु ५,०००/- (रुपये पाच हजार मात्र) ने वाढविण्याची अनुमती देण्यात येईल.

८) यशस्वी बोलीदार यांनी बोली रकमेच्या २५% रक्कम (ईएमडी रकमेसह) बोली स्वीकृत झाल्यानंतर ताबडतोब म्हणजेच त्याच दिवशी संध्याकाळी ५.०० पर्यंत किंवा कार्यालयीन कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी भरणा करणे आवश्यक आहे आणि उर्वरित रक्कम लिलावाच्या तारखेपासून १५ दिवसांत भरणा करणे आवश्यक आहे.

९) यशस्वी बोलीवर वरील प्रमाणे मुद्दा क्रमांक (८) मध्ये नमूद केल्याप्रमाणे २५% रक्कम भरणा करण्यात अपयशी ठरल्यास भरणा केलेली ईएमडी रक्कम जप्त करण्यात येईल आणि विक्री प्रक्रिया रद्द झाली आहे असे मानण्यात येईल. त्याच प्रमाणे यशस्वी बोलीदार विक्री सुनिश्चित झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत खरेदी रकमेच्या ७५% रक्कम भरणा करण्यात असफल ठरल्यास बोलीदार यांनी भरणा केलेली २५% रक्कम बँकेकडून जप्त करण्यात येईल.

१०) विक्री निश्चित झाल्यानंतर, अदायगीच्या शर्तींच्या पूर्ततेसाठी प्राधिकृत अधिकारी विक्री प्रमाणपत्र यशस्वी बोलीदार यांच्या नावे जारी करतील, सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ च्या अनुसार आणि यशस्वी बोलीदार यांनी सर्व ते कर, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क आणि आकस्मिक खर्च जे प्रमाणपत्र यशस्वी बोलीदार यांच्या नावे करण्यासाठी आवश्यक आहेत ते अदा करणे आवश्यक आहे. प्राधिकृत अधिकारी संदर्भित मालमत्तेचा ताबा संपूर्ण रक्कम प्राप्त झाल्यानंतर हस्तांतरित करतील.

११) कोणतीही बोली स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता लिलाव प्रक्रिया पुढे ढकलण्याचा तसेच लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार तसेच कोणतीही पूर्वसूचना न देता लिलावाच्या अटी आणि शर्ती बदलण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

१२) कोणत्याही भारांच्या संदर्भातील माहिती बँकेकडे उपलब्ध नाही.

१३) इच्छूक बोलीवर प्राधिकृत अधिकारी श्रीमती मधुरा अजय राऊळ, द नॅशनल को ऑप बँक लिमिटेड यांच्याशी दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५ ८६२८ येथे मालमत्तेचा संपूर्ण तपशील जाणून घेण्यासाठी संपर्क साधू शकतात.

स्थळ : मुंबई
दिनांक: ०६.११.२०२४

**सही / -**
**प्राधिकृत अधिकारी**
**द नॅशनल को ऑप बँक लिमिटेड यांच्याशी संलग्न**

निवडक

## भंगारातील पट्ट्यांची चोरी

**पनवेल :** कंपनीच्या मालकाकडून ४० किलो वजनाच्या तांब्याच्या भंगारातील पट्ट्यांची चोरी झाल्याची घटना घडली आहे. प्रीत पगारिया यांनी एमएमटीडी इंजिनियरिंग कंपनी खरेदी केली. येथे ४३ कामगार काम करतात. त्यातील मोईन बेग या कामगाराने काठीने सीसीटीव्ही कॅमेरा तोडत असल्याचे दिसून आले आहे. त्याबाबत अधिक चौकशी केली असता प्रकाश पांडे याने सीसीटीव्ही कॅमेरा तोडून टाक आणि तांब्याच्या पट्ट्या असलेल्या २ गोण्या कंपनीच्या गेटजवळ नेऊन ठेवण्यास सांगितले.

## फटाके वाजवल्याने मारहाण

**नवीन पनवेल :** फटाके वाजवण्याच्या कारणावरून मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी रात्री पत्नीसह घरी परत येत होते. एक मुलगा फटाके वाजवत होता. त्या फटाक्याची ठिणगी अंगावर आल्यामुळे त्यांनी त्याला हटकले. त्या मुलाने शिवीगाळ केली. यावेळी त्या मुलाची आई तेथे आली आणि त्या दोघांत बाचाबाची झाली. दरम्यान त्या ठिकाणी अनोळखी इसम जमा झाले आणि सात ते आठ जणांनी लाथाबुक्याने मारहाण केली.

## पैशांच्या वादातून हत्या

**नवीन पनवेल :** पैशाच्या किरकोळ वादातून तरुणाची दगडाने ठेचून हत्या केल्याप्रकरणी आरोपी विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. बेलपाडा आदिवासी वाडी मागील डोंगरावर अनोळखी इसमाचा मृतदेह पाण्यात पडला असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली. त्या ठिकाणी पोलिसांनी जाऊन पाहणी केली असता बाजूला आणि दगडावर रक्त पडलेले दिसत होते. मृत इसमाला उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## मंगळसूत्र खेचून पसार

**नवीन पनवेल :** पायी घरी परत जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचून ते चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विजय लक्ष्मी नायर आणि गोपाल कृष्ण नायर हे खारघर येथे राहत असून खारघर येथील दुकानात सामान घेण्यासाठी गेले होते. ते पायी घरी चालत जात असताना कल्पतरू हॉस्पिटलकडे जाणाऱ्या चौकात उभ्या असलेला इसमाने विजयालक्ष्मी नायर यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचले आणि तो पळून गेला.

## पाच लाखांची चोरी

**नवीन पनवेल :** दुकानाच्या गल्ल्यात ठेवलेल्या पाच लाख ९८ हजाराच्या रोख रकमेची चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चोराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. इस्माईल हजारी हे पनवेल येथे राहत असून त्यांचे गुजरात साडी सेल नावाचे साडीचे दुकान आहे. त्यांचा मुलगा मोहम्मद हा सकाळी दुकानावर गेला असता दुकानात चोरी झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ते दुकानात आले आणि त्यांनी गल्ल्यात ठेवलेले आणि पेटीत ठेवलेले पैसे पाहिले असता ते दिसून आले नाहीत.

### अंतिम मतदार यादी प्रसिध्द

# जिल्ह्यात २० हजार ६६८ मतदारांची वाढ

**। रायगड । प्रतिनिधी ।**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या विशेष संक्षिप्त पुन:रिक्षण कार्यक्रमानुसार अंतिम मतदार यादी प्रसिध्दीनुसार जिल्ह्यात पुरुष ९ हजार ३११, महिला ११ हजार ३५५ तर तृतीय पंथी २ असे एकूण २० हजार ६६८ मतदारांची वाढ झाली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे.



भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून जिल्ह्यात सात विधानसभा मतदार संघांसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

रायगड मतदार संघात एकूण २४ लाख ८८ हजार ७८८ मतदार आहेत. यामध्ये पुरुष १२ लाख ५९ हजार ५६७ मतदार तर महिला १२ लाख २९ हजार १३० मतदार तर तृतीय पंथी ९१ आहेत

पनवेल विधानसभा मतदारसंघात पुरुष ३ लाख ४६ हजार ४०२ मतदार तर महिला ३ लाख ५ हजार ५८६ मतदार तर तृतीय पंथी ७४ असे एकूण ६ लाख ५२ हजार ६२ आहेत.

कर्जत विधानसभा मतदारसंघात पुरुष १ लाख ५९ हजार २९३ मतदार तर महिला १ लाख ५९ हजार ४४६ मतदार तर तृतीय पंथी ३ असे एकूण ३ लाख १८ हजार ७४२ आहेत.

उरण विधानसभा मतदारसंघात पुरुष १ लाख ७१ हजार ५२६ मतदार तर महिला १ लाख ७० हजार ५६३ मतदार तर तृतीय पंथी १२ असे एकूण ३ लाख ४२ हजार १०१ आहेत.

पेण विधानसभा मतदारसंघात पुरुष १ लाख ५४ हजार ६६१ मतदार तर महिला १ लाख ५३ हजार ३१७ मतदार तर तृतीय पंथी १ असे एकूण ३ लाख ७ हजार ९७९ आहेत.

अलिबाग विधानसभा मतदारसंघात पुरुष १ लाख ५० हजार ५४३ मतदार तर महिला १ लाख ५५ हजार ६८६ मतदार, तर तृतीय पंथी १ असे एकूण ३ लाख ६ हजार २३० आहेत. श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात पुरुष १ लाख २९ हजार ९१८ मतदार तर महिला १ लाख ३५ हजार ३६८ मतदार असे एकूण २ लाख ६५ हजार २८६ आहेत.

महाड विधानसभा मतदारसंघात पुरुष १ लाख ४७ हजार २२४ मतदार तर महिला १ लाख ४९ हजार १६४ मतदार असे एकूण २ लाख ९६ हजार ३८८ आहेत.

# पिंपळभाटमध्ये प्रचाराचा शुभारंभ



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचाराला सुरुवात झाली आहे. चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील पिंपळभाट येथे प्रचाराचा शुभारंभ मंगळवारी नारळ वाढवून करण्यात आला.

यावेळी संदीप ढवळे, ॲड. परेश देशमुख, दत्ता ढवळे, दिनेश कवाडे, नाना घरत, मिथुन बेलोसकर, संतोष पालकर, काकडे, संजय जगे, अतुल जाधव, हर्ष ढवळे, राज ढवळे, निकोषे, व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. चित्रलेखा पाटील यांची उमेदवारी जाहीर झाल्यापासून अलिबाग विधानसभा मतदार संघातील कार्यकर्ते कामाला लागले आहेत.

रात्रीचा दिवस करून गावोगावी जाऊन मतदारांना भेटून मतदान करण्याचे आवाहन करीत आहेत. अलिबाग तालुक्यातील चेंढरे ग्रामपंचायतीच्या वार्ड क्रमांक पाच व एक येथे शेकाप कार्यकर्त्यांनी प्रचाराला सुरुवात केली. पिंपळभाट येथे नारळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

## अभिनव ज्ञानमंदिर उसरतर्फे मतदान जनजागृती

**। माणगाव । वार्ताहर ।**

तळा तालुक्यातील छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण अभिनव ज्ञानमंदिर सूर खुर्द विद्यालयाने शासनाच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत विधानसभा २० नोव्हेंबर २०२४ साठी वृंदावन येथे जनजागृती फेरी काढण्यात आली. यामध्ये विद्यालयातील इयत्ता ५ वी ते १० वी मधील सर्व विध्यार्थी रॅलीत सहभागी होते. घरोघरी जाऊन मतदारांना मतदानाचा अधिकार बजावण्यास सांगून या विषयी जनजागृती करण्यात आली. रॅलीच्या माध्यमातून मतदानाचे महत्व पटून देण्यात आले.

दिवाळीत दारात काढण्यात आलेल्या रांगोळीतूनही मतदानाचा संदेश देण्यात आला. प्रयोग



शाळांतूनही रांगोळी स्पर्धेतून मतदान जनजागृती करण्यात आली. या रॅलीमध्ये शाळेचे मुख्याध्यापक सुर्वे, ज्येष्ठ शिक्षक गुजर व सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, महिला, ग्रामस्थ आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# निवडणूक निर्भय वातावरणात पार पाडा

### ■ निवडणूक निरीक्षक रुही खान यांचे आवाहन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

निवडणूक प्रक्रिया निर्भय आणि मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन अलिबाग विधानसभा मतदारसंघाच्या सामान्य निवडणूक निरीक्षक रुही खान यांनी केले.

निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातील सभागृहात अपक्ष उमेदवारांना चिन्ह वाटप, आदर्श आचारसंहिता व खर्चाबाबत मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. उमेदवारांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश चव्हाण, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विक्रम पाटील, रोशन शिंदे उपस्थित होते.



यावेळी मार्गदर्शन करताना निवडणूक निरीक्षक रुही खान यांनी सांगितले की, निवडणुकीच्या प्रचाराकरीता एक खिडकी समितीकडून परवानगी घेणे अत्यंत आवश्यक आहे. कोणीही परवानगीशिवाय प्रचार सभा, गाड्यावरील रॅली करू नये. एकमेंकासोबत भांडण-तंटे करू नये. आदर्श आचारसंहितेचे सर्व नियम अटी पाळावेत.

मतदार वगळता, निवडणूक आयोगाकडून मिळालेला विधीग्राह्य पास ज्याच्याजवळ नाही अशी कोणतीही व्यक्ती मतदान मंडपात प्रवेश करणार नाही. मतदान पूर्ण करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपर्यंत पूर्ण होणाऱ्या ४८ तासांच्या कालावधीत जाहिर सभा घेण्यास मनाई असेल असेही निवडणूक निरीक्षक रुही खान यांनी सांगितले.

उमेदवारानी त्यांची दैंनदिन नोंदवही संपूर्ण प्रचार कार्यकाळात खर्च निरीक्षकासमोर सादर करणे आवश्यक आहे, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला, निर्वाचित उमेदवाराच्या निवडणुकीच्या तीस दिवसांच्या आत सादर कारावयाचा असतो. उमेदवारासांठी स्वतंत्र निवडणूक खर्च नोंदवही असणे आवश्यक आहे. याबरोबरच उमेदवाराने घ्यावायची खबरदारी, परवानग्या अशा अनेक निवडणुकीसंदर्भात आवश्यक त्या सर्व सूचना त्यांनी यावेळी दिल्या. या बैठकीला निवडणूक लढविणारे उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते

## मेंढपाळांची तारेवरची कसरत

**। पातळगंगा । वार्ताहर ।**

मेंढपाळ आपल्या जवळ असेलेला लवाजमा घेवून कोकणात येत असतात. कोकणातील बहुतेक शेतकरी शेती करीत असल्यामुळे घाट माथ्यावरील मेंढपाळ आपल्या मेंढ्या घेवून कोकणाकडे प्रस्थान करीत असल्याचे चित्र आपणांस सर्वत्र ठिकाणी पहावयास मिळत आहे.मात्र मेंढ्या घेवून येताना जणू मेंढपाळ यांना तारेवरची कसरत करावी लागते.

मेंढ्या ज्या शेतात बसल्या जातात. त्यांच्या विष्ठेपासून शेतकऱ्याला मोठ्या प्रमाणात फायदा होत असल्याने यामुळे जमिनीचा कस वाढण्यास मदत होत असते. शिवाय उत्तम पिक येत असते. यामुळे सध्या खालापूर, कर्जत, चौक अशा अनेक ग्रामीण भागाच्या ठिकाणी शेतकरी मेंढपाळांचे स्वागत



करीत असल्याचे दृश्य आपणास पहावयास मिळत आहे.

भात शेती कापली कि कापलेल्या जागी नवीन गवत उगवत असतात. हेच कोवळे गवत मेंढ्याचे खाद्य असते. पावसाच्या पाण्यावर अनेक प्रकारच्या काटेरी वनस्पती वाढली असतात. या काटेरी वनस्पती पासून मेंढ्यांना सकस आहार मिळत असतो. शिवाय या खाद्यामुळे दुध व्यवसाय तेजीत चालतो. सध्या कोकणामध्ये औद्योगिकरण मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे हवे तसे खाद्य उपलब्ध होत नाही.

## अतुल म्हात्रे हेच महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार - सुरेश खैरे

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाचे नेते सुरेश खैरे यांनी पाली येथील निवासस्थानी सुधागड तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या सभेचे आयोजन मंगळवारी (दि. ५) करण्यात आले होते.

सुरेश खैरे उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, अतुल नंदकुमार म्हात्रे हेच पेण सुधागड रोहा या मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आहेत. निवडणूक आयोगाने त्यांना शिट्टी ही निशाणी दिली आहे. हे निवडणूक चिन्ह



मतदारसंघातील मतदारापर्यंत पोहोचवा आणि आपल्या उमेदवाराला भरघोस मतांनी विजयी करा असे आवाहन सुरेश खैरे यांनी केले. सुधागड तालुक्याच्या विकास कामात शेतकरी कामगार पक्षाचे योगदान मोठ्या प्रमाणावर आहे. लवकरच तालुक्यातील महाविकास आघाडीच्या पदाधिकारी यांच्या समवेत चर्चा करून प्रचाराला सुरुवात केली जाईल, असे सुरेश खैरे यांच्यावतीने सांगण्यात आले.

# शेकाप आमदार विधिमंडळात असणे गरजेचे

### माजी उपसभापती शुभांगीताई पाटील यांचे प्रतिपादन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्ष हा जनतेच्या हृदयातील पक्ष आहे. राजकारणाच्या बदलत्या प्रवाहात कष्टकरी, श्रमजीवी जनतेचे प्रश्न विधिमंडळात ठामपणे मांडण्यासाठी शे.का.पक्षाचे आमदार विधिमंडळात असणे, गरजेचे आहे. असे मत उरण पंचायत समितीच्या माजी उपसभापती शुभांगी पाटील यांनी व्यक्त केले आहे. शेतकरी कामगार पक्षाचे उरण तालुका सहचिटणीस सुरेश पाटील यांच्या सहचारणी तथा उरण पंचायत समितीच्या माजी उपसभापती शुभांगी पाटील यांच्याशी निवडणुकीसंदर्भात कृषीवलच्या प्रतिनिधीशी संवाद साधला असता, त्या बोलत होत्या.

विधानसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांच्या एकीमुळे शेकापक्ष या निवडणुकीत उतरला असून, ही निवडणूक ताकतीने लढू असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. दरम्यान शेतकरी कामगार पक्षातर्फे प्रीतम जनार्दन म्हात्रे हे कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर उरण विधानसभेची निवडणूक लढविण्यासाठी सज्ज झाले आहेत. ही निवडणूक जिंकण्याबाबत मनामध्ये काहीही शंका नाही. राजकारणाच्या माध्यमातून सामाजिक विचार टिकविण्याचा प्रामुख्याने शेतकरी कामगार पक्षाने पुढाकार घेतला आहे. शेतकरी कामगार पक्षाला मोठा इतिहास आहे. आता नवीन पिढीला जुने राजकारण आणि नवे राजकारण शिकविण्याची वेळ आलेली आहे. आपला उमेदवार जनतेच्या बांधिलकीचा आहे. सध्याच्या विरोधी उमेदवारांची समाजाप्रती बांधिलकी ती काय? आणि वैचारिक भूमिका काय? असा सवालही त्यांनी बोलताना व्यक्त केला.

शेकापक्षाचा भूगोल लहान असेल, पण इतिहास फार मोठा आहे. हे उभ्या महाराष्ट्राला माहीत आहे. पक्ष कधी संपत नाही. आपला पक्ष मतदारांच्या जीवावर उभा आहे. त्यामुळे आपली ताकद विरोधकांना या निवडणुकीत दाखवायची आहे. जनतेशी बांधिलकी असणाऱ्या प्रितम म्हात्रे यांना उद्याच्या निवडणुकीत विरोधकांविरुद्ध मतदान करा. असे आवाहनही माजी उपसभापती शुभांगीताई पाटील यांनी मतदारांच्या भेटीगाठीत केले आहे.



### हटके लग्न आमंत्रणपत्रिकेला वधू वराची पसंती

# रुमाल लग्नपत्रिका ठरतेय आकर्षण

**। जुनेद तांबोळी ।**
**। महाड ।**

महाराष्ट्रात सध्या अनेकजण अनोखी लग्न पत्रिका छापत असल्याचं गेल्या काहिवर्षं पासून आढळून आलं आहे. महाड शहरातील एका कुटुंबियाने हात रुमालावरती पत्रिका छापून अनोखा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे.

लग्न म्हटलं लग्नपत्रिका ही हमखास असते. आज-काल लग्न सोहळे अत्यंत दिमाखदार पद्धतीने केले जातात. त्यामुळे लग्न सोहळ्यातील प्रत्येक गोष्ट काहीतरी खास असली पाहिजे असा हट्ट नवरा नवरीचा असतो. त्यामुळे लग्नाच्या पत्रिका असो किंवा पोशाख त्यामध्ये काही ना काही वेगळं अनेकांना हवे असते. अनेकदा अशा हटके लग्नपत्रिकेची बाजारात चलती आहे कोणी रुमालावर लग्नपत्रिका छापते तर कोणी खिशात मावेल इतकी छोटी पत्रिका तयार करतो, तर कोणी संस्कृतमध्ये पत्रिका तयार करतो.

तुमचा लग्नाचा दिवस हा एक संस्मरणीय प्रसंग आहे जो आयुष्यात एकदाच घडतो. लग्नाची आमंत्रणे तुमच्या लग्नाच्या दिवसाची फक्त अतिथींना माहिती देण्यापलीकडे एक उद्देश पूर्ण करतात.

एक सुव्यवस्थित लग्न आमंत्रण तुमच्या लग्नाचा मूड सेट करते आणि तुमचे बंधन दाखवते. हे कार्यक्रमाचा टोन, थीम आणि महत्त्व यांचे प्रतिनिधित्व म्हणून कार्य करते. हा एक विशेष स्मृतीचिन्ह आहे जो या संस्मरणीय क्षणाचा आनंद आणि आनंद कॅप्चर करतो, तुमच्या लग्नाच्या आठवणींचा एक महत्त्वाचा पैलू बनतो.

प्राध्यापक डॉ. समीर अरुण बुटाला यांनी आपल्या कन्येची लग्न पत्रिका वेगळपण जपत हात रुमालावर छापली आहे. आपण नेहमीच पॅन्टच्या खिशात हात रुमाल ठेवतोच, बरोबर ना त्याच पांढऱ्या शुभ्र हात रुमालावर ही पत्रिका छापली आहे. आकर्षक तर ही पत्रिका आहेच, शिवाय धुतल्या नंतर निमंत्रण दिलेल्या व्यक्तीच्या उपयोगात ही येणार आहे.



## गोरेगाव ना.म. जोशी विद्याभवनातर्फे पथनाट्याद्वारे मतदान जनजागृती

**। माणगाव । वार्ताहर।**

स्विप मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत तालुक्यातील ना.म. जोशी विद्या भवन गोरेगाव यांच्यातर्फे नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा याबाबत पथनाट्याद्वारे मतदान जनजागृती करण्यात आली.



मतदान हा एक देशातील लोकशाहीचा महत्वाचा घटक आहे. मतदानाची प्रक्रिया सर्वांना समान अधिकारांना देते. हे एक सामाजिक न्यायाचे माध्यम आहे. मतदानाची प्रक्रिया एक देशाची लोकशाही मजबूत आधारभूत शिक्षा आहे. मतदान करण्याचे नागरिकांना समाजातील महत्वाचे दिले जाते. कारण हे त्याच स्वाभिमान आणि सुव्यवस्थित प्रक्रिया असून त्यामुळे लोकांना आपल्या देशाच्या निर्मितीचा भाग व्हायच आहे. या प्रक्रियांचा पालन असेल तर मानवी अधिकार न्याय, समानता, विविधता, विकास आणि सुरक्षा या सर्व मूल्यांचे पालन होईल. या गोष्टींचा विचार करीत गोरेगाव ना.म. जोशी विद्या भवन या शाळेत मतदान जनजागृती करीता रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. सदर कार्यक्रम च्या अंमलबजावणीसाठी शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, विद्यार्थी, पालक, गोरेगाव शहरातील नागरिक आदींनी सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

# मराठी स्वाभिमानासाठी

महाराष्ट्रातील लढतींचे चित्र आता स्पष्ट झाले आहे. लोकसभेला ज्याप्रमाणे इंडिया आघाडीने एकत्रितपणे भाजप युतीचा मुकाबला केला होता तसे यावेळी घडू शकलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. शेकाप, डावे पक्ष इत्यादींना सामावून घेण्याबाबतची महाविकास आघाडीची अनास्था अनाकलनीय होती. त्यामुळे काही जागांवर मैत्रीपूर्ण लढती तर काही ठिकाणी महाविकास आघाडीचा एकमेव ठळक उमेदवार अशी संमिश्र स्थिती आहे. असो. आता रिंगण आखले गेले आहे. लोकसभेला मोदींच्या हुकुमशाही राजवटीला वेसण घालणे हे सर्वांचे उद्दिष्ट होते. महाराष्ट्रातील जनतेने त्याला साथ दिली. हा लढा संपलेला नाही. महायुती हे मोदींच्या राजवटीचेच अपत्य आहे. विविध धमक्यांच्या आधारे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पाडून हे सरकार स्थापन झाले. शिंदे गटाला खोके दिल्याचे आरोप झाले. तर अजितदादा गटावरच्या खटल्यांमध्ये क्लिन चीट देऊन मांडवली करण्यात आला. नैतिक, राजकीय, आर्थिक अशा सर्व प्रकारच्या भ्रष्टाचारातूनच या सरकारचा जन्म झाला. त्यामुळेच त्याचा नंतरचा कारभार म्हणजे जनतेची नाडणूक व ओरबाडणूक आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाचा चिखल करण्याचे पाप दिल्लीतील मोदी-शाह यांच्या आशीर्वादाने महायुतीच्या नेत्यांनी गेल्या अडीच वर्षात केले आहे. या प्रवृत्तींविरुध्दच्या लढाईसाठी महाविकास आघाडी व सर्व पुरोगामी पक्ष सज्ज झाले आहेत. जनता याहीवेळी त्यांना साथ देईल अशी अपेक्षा आहे. महाविकास आघाडीत जागावाटपावरून बरेच मतभेद आले व त्यांची चर्चा मिडियातून चव्हाट्यावर आणली गेली. प्रत्यक्षात महायुतीमध्ये त्याहूनही अधिक मारामाऱ्या होत्या. पण युतीच्या नेत्यांना मिडिया मॅनेज करण्याचे तंत्र अवगत असल्याने टीव्ही चॅनेल्सवर त्याची चर्चा नव्हती. पण अखेर चार नोव्हेंबरनंतर ही झाकली मूठ उघडी पडली आहे. युतीमध्ये जागोजागी बंडखोरी झाली आहे. शिंदे, फडणवीस आणि अजितदादा यांच्यातील सुंदोपसुंदी मुंबई-ठाण्यापासून ते नागपूरपर्यंत सर्वत्र झळकते आहे. आघाडीतल्या नेत्यांचे जाहीर वाद झाले. पण छुप्या कटारींनी आपसात वार करणाऱ्या युतीवाल्यांची ही दगलबाजी शतपटीने भयानक आहे.

### भाजपचे तीन तेरा

भाजप हा मोठा शिस्तबध्द पक्ष मानला जातो. पण यावेळी सर्वाधिक बंडखोरी त्याच पक्षात झाली. इतकी की, ती शमवण्यासाठी थेट दिल्लीहून धमक्या द्याव्या लागल्या. विदर्भातल्या दादाराव केचे यांच्यासारख्या विद्यमान आमदारांना तिकिट नाकारून तिथे देवेंद्र फडणवीसांच्या सेक्रेटरीची वर्णी लावण्यात आली. नंतर केचे यांना बंडखोरी मागे घ्या हे सांगण्यासाठी थेट अमित शाह यांच्यासमोर नेऊन उभे केले. तरीही विदर्भात बंडखोरी कायम आहे. पुण्यात भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे हेच नाराज होते. ते आणि इतरांना माघार घ्या असे सांगायला देवेंद्रांना पुण्यात मुक्काम करावा लागला. या बंडखोरांच्या घरी जातीने जावे लागले. याचाच अर्थ भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. खाली मतदारही चिडलेले आहेत. वाटेल त्या युत्या आणि तडजोडींचे राजकारण त्यांना झेपेनासे झाले आहे. हा असंतोष थोपवण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. त्याचा स्फोट निवडणुकीत होणार आहे. शिंदे गट आणि अजितदादा यांना तर कसलेच ताळतंत्र नाही. मुळात विश्वासघातावर उभे राहिलेले हे दोन तथाकथित पक्ष आहेत. त्यामुळे गुंडांच्या टोळ्यांमध्ये होतात तशी भांडणे होणे हे अपरिहार्यच होते. तसे ते झाले आहे. एकनाथ शिंदे यांनी आपली इभ्रत राखण्यासाठी सर्व आमदारांना प्रचंड पैसे दिले असल्याचे म्हणतात. पण या आमदारांबाबत जनतेतली नाराजी या पैशांनी दूर होऊ शकत नाही. पैशांनी सर्व काही विकत घेता येते ही शिंदे गटाची आणि पर्यायाने या सरकारची मग्रुरी तयार झाली आहे. लाडकी बहीण किंवा फुकट सिलेंडर यासारख्या योजना या त्याचेच निदर्शक आहेत. आता या योजना देऊनही मते मिळतील की नाही याची भीती वाटत आहे. त्यामुळे सरकार गेले तर या योजना बंद होतील अशी भीती घातली जात आहे. हा सर्व खोटा प्रचार आहे.

### शिंदे गटाचा माज

या योजनांमुळे सरकारचे दिवाळे वाजेल व सरकारकडे कर्मचाऱ्यांना पगारांसाठीही पैसे शिल्लक राहणार नाहीत असा इशारा जाणकार व काही माजी वरिष्ठ अधिकारी देत आहेत. ते जनतेलाही कळत असतेच. पण शिंदे गटाचा माज असा आहे की, उद्या ते आपण पैशांचा छापखाना टाकू असेही सांगायला कमी करणार नाहीत. शिंदे सरकारची ही आश्वासने निवडणूक आयोगाला खटकत नाहीत. त्यांच्याकडून वाहवला जाणारा पैसा आयोगाला किंवा केंद्राच्या यंत्रणांना दिसत नाही. तमिळनाडू आणि कर्नाटकामध्ये मात्र ऐन विधानसभा निवडणुकीच्या काळात द्रमुक आणि काँग्रेसच्या नेत्यांवर धाडी घालण्यात आल्या होत्या. एरवी लोकसभेसाठी महाराष्ट्रात पाच-पाच फेऱ्या घेण्यात आल्या. यावेळी मात्र दिवाळीचा मुहूर्त साधून निवडणूक प्रक्रिया राबवण्यात आली. त्यामुळे प्रचाराला अवघे पंधरा दिवस मिळणार आहेत. त्या काळात सर्व मतदारसंघांमध्ये पोचण्याचे मोठे आव्हान आहे. अर्थात, आजचा जमाना सोशल मिडिया आणि टीव्हीचा आहे. त्यामधून दिवसरात्र राजकारणाची चर्चा चालू असते. जनतेने ती ऐकलेली आहे. युतीचे कारनामेही पाहिलेले व अनुभवलेले आहेत. त्यांचा हिशेब करताना जनता कुचराई करणार नाही. महाराष्ट्राची गेल्या दहा वर्षात आर्थिक आघाडीवर कशी पीछेहाट झाली हे सांगणारा एक अहवाल अलिकडेच प्रसिध्द झाला. विशेष म्हणजे पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेतील दोघा तज्ज्ञांनीच तो तयार केलेला असून त्यात महाराष्ट्र इतर राज्यांच्या व विशेषतः गुजरातच्या तुलनेत मागे पडत चालला असल्याचे स्पष्ट दिसते. दरडोई उत्पन्नात तर महाराष्ट्राचा क्रमांक आता सहावा झाला आहे. एकनाथ शिंदे आल्यापासून तर सर्व काही मोदी-शाह यांच्या इशाऱ्याने चालू झाले आहे. शिंदे गटाचे कोल्हापुरात पहिले अधिवेशन झाले त्यावेळी महत्वाचे पहिले व दुसरे ठराव हे मोदी व शाह यांच्या अभिनंदनाचे होते. हे सर्व लाज आणणारे आहे. महाराष्ट्राचा स्वाभिमान पुन्हा प्रस्थापित करायचा आहे या एका मुद्द्यावर विरोधकांनी ही निवडणूक लढवायला हवी.

विचार

# लिगो : नव्या जगाचे उघडले दालन

***जगातील तिसरी लिगो ही गुरुत्वीय तरंग वेधशाळा नासाकडून भारतात उभारली जाते आहे. भारतात, महाराष्ट्राच्या हिंगोली तालुक्यात औंढा नागनाथ या ठिकाणी ती आकाराला येत आहे. जवळपास १३०० कोटी रुपये खर्चून उभारली जात असलेली ही जगातली महत्वाकांक्षी प्रयोगशाळा आहे. वैश्विक संशोधनाला कलाटणी देणारी ही जगातील केवळ तिसरी आणि अमेरिकेबाहेरची पहिलीच प्रयोगशाळा असणार आहे.***



मेधा इनामदार

या विश्वात अशा अनेक घटना घडत असतात, ज्या माणसाच्या कल्पनेच्या पलीकडल्या आहेत. एकूणच विश्वाची निर्मिती आणि त्यात घडत असलेल्या अनेक गूढ गोष्टी कुतुहलजनक असतात. त्यामागची कारणे आज माणसासाठी अज्ञात आहेत. परंतु तो स्वस्थ बसलेला नाही. त्यामागील विज्ञान समजून घेण्याची धडपड अथक सुरु आहे. त्यासाठी विविध मार्गांचा आणि साधनांचा उपयोग करून अशा घटनांचा शोध घेण्याचा प्रयत्न संशोधक करत आहेत. लिगो हा त्यातीलच एक भाग आहे. 'लिगो' ही लेझर इंटरफेरोमीटर गुरुत्वीय-तरंग वेधशाळा. ही जगातील सर्वात मोठी गुरुत्वीय तरंग वेधशाळा आहे. अमेरिकेच्या नॅशनल सायन्स फाउंडेशनच्या पाठिंब्याने ही वेधशाळा उभारण्यात आली आहे. या प्रयोगशाळेच्या माध्यमातून गुरुत्वीय लहरींचा अभ्यास केला जाणार असून त्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील शास्त्रज्ञ या ठिकाणी थांबणार आहेत. भारतामध्ये उभारली जाणारी ही पहिलीच प्रयोगशाळा असल्यामुळे केंद्र शासनासह राज्य शासनाचे या प्रयोगशाळेच्या उभारणीकडे विशेष लक्ष आहे. या प्रयोगात गांधीनगरची प्लाझ्मा संशोधन संस्था, पुण्यातील आंतरविद्यापीठ खगोलशास्त्र व खगोलभौतिक केंद्र (आयुका), इंदोरचे राजा रामण्णा प्रगत तंत्रज्ञान केंद्र या संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे. लायगो इंडियाचे संपर्क अधिकारी व लायगो हॅनफोर्ड प्रयोगशाळेचे संचालक फ्रेड रॅब यांनी २०२३ पर्यंत या उपकरणाचे काम भारतात सुरू होऊ शकेल असा विश्वास २०१६ मध्येच व्यक्त केला होता.

लिगो म्हणजे नक्की काय हे समजून घेण्यासाठी आपल्याला आधी गुरुत्वीय लहरी म्हणजे नेमके काय हे समजून घ्यावे लागेल. गेल्या शतकात विख्यात शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन यांनी म्हटले होते की कृष्णविवरांचे म्हणजेच ब्लॅक होल्सचे मिलन किंवा न्युट्रॉन ताऱ्यांची टक्कर अशा वैश्विक घटना घडतील तेव्हा अवकाशात त्यांच्या प्रचंड वस्तुमानामुळे आणि त्यांच्याकडे असलेल्या प्रचंड गुरूत्वीय बलामुळे लहरी तयार होतील. नदीच्या पाण्यात दगड टाकल्यावर जसे तरंग निर्माण होतात, त्याच पद्धतीने या लहरी तयार होऊन विश्वाच्या पोकळीत प्रवास करतील. या लहरी त्यांच्या वाटेत येणाऱ्या ग्रह-ताऱ्यांवर आदळतील तेव्हा हे विश्व अवकाशकाळामध्ये जेलीच्या बॉलप्रमाणे आकुंचन आणि प्रसरण पावेल. अवकाश काळ म्हणजेच स्पेस टाइम ही भौतिकशास्त्रातील एक संकल्पना आहे. याद्वारे या विश्वातील स्थान, आकार आणि अंतर या तीन मिती वेळ या चौथ्या आयामामध्ये एकत्र केल्या जातात आणि त्याद्वारे घटनांची मीमांसा केली जाते.

पूर्ण विश्वात तरंग उमटवायला विश्वात होणारी उलथापालथ ही तितकी प्रचंड असली पाहिजे. त्यामुळे गुरूत्वीय लहरी ओळखणे कठीण आहे. कारण या तरंगामुळे होणारे पृथ्वीचे आकुंचन आणि प्रसरण हे अवघ्या एका फोटॉनच्या आकाराचे असू शकते. तसेच या तरंगाची क्षमताही त्या उलथापालथीवर अवलंबून असते. अशा गुरूत्वीय लहरी निर्माण करू शकणाऱ्या विश्वातील घटनांमध्ये दोन कृष्णविवरांचे मिलन, दोन न्युट्रॉन ताऱ्यांचे एकमेकाभोवती फिरणे आणि सुपरनोव्हाची निर्मिती या घटना आहेत. विश्वाच्या पटलावर अशा घटना घडतात, तेव्हा त्याचे तरंग गुरुत्वीय लहरींच्या स्वरूपात प्रकाशाच्या वेगाने प्रवास करतात. हे तरंग पृथ्वीवरही सतत आदळत असतात. पण ते ओळखणे तंत्रज्ञानाला आधी शक्य नव्हते. कारण एका फोटॉनच्या आकारात होणारा फरक मोजणारी यंत्रणा आपल्याकडे नव्हती. पण विज्ञानात नित्य होत असणाऱ्या प्रगतीमुळे आता आपण तशी यंत्रणा निर्माण करू शकत आहोत. त्यामुळे या लहरी पृथ्वीवर आदळतील तेव्हा होणाऱ्या पृथ्वीच्या आकुंचन आणि प्रसरणावरून ही लहर नक्की केव्हा अस्तित्वात आली याबद्दल सांगता येईल.

२०१५ या वर्षी लिगो तयार होऊन काम करायला लागली, तेव्हा प्रथमच आपल्याला पृथ्वीवर लहरींची जाणीव झाली. ही गुरुत्वीय लहर १.५ अब्ज वर्षांपूर्वी दोन कृष्णविवरांच्या मिलनातून तयार झाली होती. म्हणजे १.३ अब्ज वर्षांपूर्वी निघालेली ही वेव्ह तब्बल तीन लाख किलोमीटर प्रती सेकंद या वेगाने पृथ्वीवर यायला इतकी वर्षे लागली. आतापर्यंत प्रकाश हे एकाच माध्यम घेऊन आपण विश्वाकडे बघत आलो आहोत. पण या वेव्हने १.३ अब्ज वर्षांपूर्वीची माहिती पृथ्वीवर पोचवली त्या वेळेस आपण एका नवीन दरवाज्यातून विश्वाकडे बघू लागलो. आईनस्टाईनने ते स्वप्न बघितले आणि लिगोने तो दरवाजा शोधला. लिगोने ४ जानेवारी २०१७ रोजी शोधलेली तिसरी वेव्ह तब्बल तीन अब्ज वर्षांपूर्वी तयार झाली होती. म्हणजे त्या वेळेचा पूर्ण इतिहास ही वेव्ह आपल्यासोबत घेऊन प्रवास करत होती. या वेव्हच्या अभ्यासातून आपल्याला अनेक गोष्टी समजणार आहेत, ज्याबद्दल आपण अजून अनभिज्ञ आहोत. गुरूत्वाकर्षणाकडे बघण्याचा आपला दृष्टीकोनच पूर्ण बदलून जाणार आहे. भारतासाठी अभिमानाची बाब ही की लिगो तयार करण्याकामी भारतीय वैज्ञानिक अग्रेसर राहिले आहेत. आईनस्टाईनच्या ज्या थेअरी ऑफ रिलेटीव्हिटी म्हणजेच सापेक्षतावादाच्या सिद्धांतावर आपण आज हे संशोधन करू शकलो, ते लिगो उपकरण बनवण्यात भारतीय वैज्ञानिकांचे प्रचंड योगदान आहे. जगातील अशा एक हजारहून अधिक वैज्ञानिकांमध्ये भारताच्या अनेक संशोधकांनी योगदान दिले आहे.

गुरुत्वीय लहरी आणि अंतराळ संशोधनाशी निगडीत असलेले विज्ञान आणि इंजिनीअरिंग यावर प्रकाश टाकणाऱ्या या लिगोमध्ये काटकोनात छेदणारे इंग्रजी एल आकाराचे निर्वात पोकळी निर्माण करणारे चार किलोमीटरचे दोन आर्म आहेत. या दोन्ही मार्गांच्या टोकांना मृदु आणि अत्यंत संवेदनशील असे आरसे बसवलेले असतात. सर्वसामान्यपणे प्रकाशझोत यावर पडतो तेव्हा आरशांवर परावर्तित होऊन प्रकाशकिरण एकाच वेळी परत येतील अशी अपेक्षा असते. परंतु ग्रॅव्हीटेशनल वेव्ह पृथ्वीवर आदळते तेव्हा या आर्मच्या लांबीमध्ये फरक पडतो. निर्वात पोकळीचा एक भाग प्रसरण पावतो आणि दुसरा आकुंचन पावतो. प्रकाशकिरणही परावर्तीत होऊन वेगवेगळ्या वेळी येतात. हाच फरक लेझर, मिरर आणि अतिसूक्ष्म बदल नोंदवणाऱ्या उपकरणांनी बंदिस्त केला जातो. कृष्णविवरात होणाऱ्या गुरुत्वीय लहरींचे परिणाम शोधण्यासाठी याचा उपयोग होऊ शकतो, असे शास्त्रज्ञांना वाटत आहे. त्यामुळेच सर्वांनाच या प्रयोगांविषयी उत्सुकता आहे. आईनस्टाईनने बघितलेले आणि अभ्यासलेले स्वप्न आपण आता प्रत्यक्षात अनुभवतो आहोत. या विश्वाच्या पसाऱ्यात आपल्याला माहीत असलेल्या गोष्टी खूप कमी आहेत. आजवर प्रकाश या एकाच दरवाज्याने आपण विश्व बघत आलो. पण आता ग्रॅव्हिटेशनल वेव्हमुळे आणखी एक दरवाजा उघडला गेला आहे. यातून विश्व समजून घेणे मोठेच रंजक असणार आहे. यात आपल्या देशाचा आणि भारतीय संशोधकांचा वाटा मोठा आणि महत्वाचा असेल.

आपल्या देशासाठी चांद्रयान, आदित्य याप्रमाणेच हा एक अत्यंत महत्वाचा प्रयोग ठरेल. सरकारने या प्रकल्पासाठी २६०० कोटी रुपये मंजूर केले आहेत. हिंगोली येथे उभे राहणारे हे निरीक्षणगृह २०३० पर्यंत पूर्ण होऊन काम सुरू करेल, अशी अपेक्षा आहे. वर्षभरापूर्वी एका संयुक्त निवेदनात राष्ट्राध्यक्ष जो बायडेन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतात लेझर इंटरफेरोमीटर ग्रॅव्हिटेशनल-वेव्ह ऑब्झर्व्हेटरी म्हणजे लिगोच्या बांधकामाच्या प्रारंभाचे स्वागत केले आहे. गुरुत्वीय लहरींचा अभ्यास करणारा हा दक्षिण गोलार्धातील महत्वाचा प्रकल्प आहे. त्यामुळे भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र आणि विश्वउत्पत्तीचे गूढ उकलण्यासाठी केल्या जाणाऱ्या अभ्यासात भारताला जागतिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचे स्थान प्राप्त होईल. भारतातील प्रयोगशाळा, औद्योगिक आस्थापनांना त्यांच्या क्षमता वाढवण्यासाठी याचा उपयोग होऊ शकेल. या प्रकल्पामुळे बुद्धिमान आणि तंत्रकौशल्ये आत्मसात केलेल्या तरुणांना उत्तम संधी प्राप्त होऊ शकेल. विज्ञानाच्या हातात हात घालून होणाऱ्या या प्रवासात अंतराळातील कोणती नवी रहस्ये उघडली जाणार आहेत याची उत्सुकता आता सर्वांनाच आहे.

आजकाल

# ट्रम्प विरुद्ध हॅरिस - काय फरक पडणार?



संजीव चांदोरकर

दर चार वर्षांनी नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष पदासाठी सार्वत्रिक निवडणूक होते. तो दिवस उद्या आहे. रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प आणि डेमोक्रॅटिक पक्षाच्या कमला हॅरिस यांच्यामध्ये ही लढत होत आहे.

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष तांत्रिकदृष्ट्या त्या एका देशाचा राष्ट्रप्रमुख असला तरी तो जगातील अनेक देशांच्या राजकारण आणि अर्थकारणावर प्रभाव टाकू शकतो. म्हणून कोण निवडून येणार याकडे साऱ्या जगाचे लक्ष असते.

अमेरिकेतील द्विपक्षीय प्रणाली अमेरिकेतील नागरिकांसाठी काही बाही फरक करत असेल. पण अमेरिकेच्या बाहेरच्या जगासाठी कोण सत्तेवर येणार यामुळे फारसा फरक पडत नाही.

याचे कारण रिपब्लिकन आणि डेमोक्रॅटिक पक्षात अमेरिकेच्या लष्करी, राजनेतिक, आर्थिक, व्यापारी, डॉलर विषयक आणि साम्राज्यवादी हितसंबंध केंद्रस्थानी ठेवण्यावर एकमत आहे. मग त्यांचे उमेदवार जाहीर भाषणातून काहीही बोलू देत. कोणीही निवडून आला तर फार तर फार प्राधान्यक्रम वर खाली होतील पण धोरणांचा लंबक दुसऱ्या टोकाला कधीही जात नाही.

ज्या देशात ताकदवर राज्यकर्ता वर्गाची घट्ट पकड तयार होते, त्या देशात कोण पक्ष, नेता राज्य करतो हे दुय्यम बनते. सत्ता नेहमीच राज्यकर्त्या वर्गाची असते.

डोनाल्ड ट्रम्प किंवा कमला हॅरिस यांच्यापैकी कोणीही सत्तेवर आले तरी खालील मुद्द्यांवर त्यांच्यात व्यापक सहमती आहे.

१. इस्रायलच्या पाठीशी निःसंदग्धपणे उभे राहणे, इस्रायला हवा तो शस्त्रपुरवठा करणे.

२. चीनच्या जगातील वाढत्या प्रभावाला लोक रोखणे आर्थिकच नाही तर लष्करी, राजनैतिक देखील.

३. गेल्या ३० वर्षात आपली उत्पादन केंद्रे इतर देशात हलवलेल्या अमेरिकन कंपन्यांना घरवापसी करण्यासाठी प्रोत्साहन देणे.

४. संरक्षण सामग्रीवर चढत्या क्रमाने खर्च करतच राहणे.

५. महाकाय अर्थसंकल्पीय त्रुटी सुरूच ठेवणे

६. युनायटेड नेशन्स (युनो), जागतिक व्यापार संघटना (डब्ल्यूटीओ) यांना लंगडतच ठेवणे. नाणेनिधी (आयएमएफ) चे लोकशाहीकरण रोखून धरणे. अशा अनेक आंतरराष्ट्रीय संस्था आपल्या पुठ्याखाली ठेवणे

७. डॉलर या अमेरिकन चलनाची दादागिरी सुरूच राहील हे पाहणे; आंतरराष्ट्रीय पर्यायी चलनाचे प्रयत्न हाणून पाडणे.

८ पृथ्वीवरील २०० हुन अधिक लष्करी / नाविक तळ सुरूच ठेवणे , त्यात भर घालणे

डोनाल्ड ट्रम्प वि कमला हॅरिस (२)

माय ओन टेक.

जनविरोधी आर्थिक धोरणे अमलात आणणारे राज्यकर्ते, वांशिक, धार्मिक, द्वेषावर आधारित जनविरोधी सामाजिक/राजकीय धोरणे अमलात आणणाऱ्या राजवटीपेक्षा परवडले.

कारण सरळ आहे. विरोध करण्यासाठी, राज्यकर्ते बदलण्यासाठी तुम्ही किमान जिवंत असणे हि पूर्वअट आहे. दुसऱ्या प्रकारच्या राजवटीत त्याचीच शाश्वती राहत नाही. जर डोनाल्ड ट्रंप अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले तर जगातील अनेक देशांत विंगेत उभे असणाऱ्या वंशवादी, रेसिस्ट, सामाजिक, राजकिय शक्तींना बळ मिळेल. खुद्द अमेरिकेतील वांशिक विविधतेला खार लागेल. याचे दीर्घकालीन परिणाम होऊ शकतात.

आजच्या आधीच फळ्या/चिरफळ्या झालेल्या जगासाठी ते चांगले नसेल.

लोकसंसद

## ध्वनी-वायूचे प्रदूषण आणि आगीचीही दिवाळी झोकात साजरी

दिवाळीत फटाके वाजविण्याचा संदर्भात महापालिका प्रशासनाने प्रसृत केलेली नियमावली, प्रदूषण होऊ नये म्हणून प्रदूषण नियामक मंडळाने जारी केले आदेश, उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी ध्वनिविरहित हरित फटाक्यांचा वापर करण्याविषयी केलेल्या सूचना, पर्यावरण संवर्धनाचे काम करणाऱ्या संस्थांनी केलेले प्रबोधन या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून सालाबादप्रमाणे यंदाची दिवाळीही मोठ्या धुमधडाक्यात साजरी करण्यात आली. परिणामी आवाजाची पातळी काही ठिकाणी १०० ते १२० डेसिबल पर्यंत पोहोचली आणि मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण झाले. फटाक्यांमुळे हवेची गुणवत्ता ढासळल्याने वायु प्रदूषणात कमालीची वाढ झाली. हवेचा गुणवत्ता निर्देशांक (एअर क्वालिटी इंडेक्स) गेले काही दिवस सरासरी २०० च्या आसपास पोहोचला. सर्वाधिक प्रदूषण वरळी (एक्यूआय ३७६) आणि मालाड (२५१) येथे नोंदवले गेले. दुसरीकडे आगीच्या घटना घडू नये यासाठी दिवाळीत फटाके वाजवताना नेमकी कोणती काळजी घ्यावी यासाठी मुंबई अग्निशमन दलाने मुंबईतील अनेक ठिकाणी जनजागृती मोहीम केली होती. तरीही दिवाळीच्या पाच दिवसांमध्ये फटाक्यांमुळे आग लागल्याच्या लहान-मोठ्या ६९ घटना घडल्या. सुदैवाने या आगीच्या घटनांमध्ये जीवितहानी झाली नसली तरी वित्तहानी मात्र खूप झाली. अशा प्रकारे ध्वनी-वायु प्रदूषणाने आणि आगीनेही सालाबादप्रमाणे यंदाची दिवाळी झोकात साजरी केली. **- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**६ नोव्हेंबर**

**१८७१ :-** 'आजचे महाराष्ट्रसारस्वत' हे या सदराचे नाव ज्यांच्या 'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथावरुन देण्यात आले आहे, ते विनायक लक्ष्मण भावे यांचा जन्म. मराठी वाङ्मयाचा इतिहास त्यांनी महाराष्ट्रसारस्वत' या दीर्घ निबंधवजा गंथातून मांडला होता, त्याच्या द्वितीयावृत्तीत (१९१९) महानुभाव वाङ्मयाची भर त्यांनी घातली. नागेश कवींचे 'सीता स्वयंवर', 'रुक्मिणीस्वयंवर', 'तुकाराम गाथा', 'शिशुपालवध', 'वच्छाहरण' हे महानुभव ग्रंथ, 'मराठी दप्तर' या त्यांनीच स्थापलेल्या प्रकाशनातर्फे 'श्रीमंत महाराज भोसले यांची बखर' व सरदार गोखले यांची कैफियत' हे आदींचे संपादन त्यांनी केले. **१८९० :-** मराठी गद्यकाव्याचे आद्य प्रवर्तक अशा बिरुदावतीने सन्मानित झालेले कविभुषण बळवंत गणेश खापर्डे यांचा जन्म. 'काव्यकांतार' या दीर्घ काव्यातुन त्यांनी कवीच्या काव्यनिर्मितीच्या प्रक्रिय व प्रतिभेच्या गुढ स्वरुपाचे विवेचन केले तर ईश्वराला उद्देशून लिहिलेली भावार्त रचना म्हणजे अनंताची हाक. याशिवाय 'अफजलवधाचा पोवाडा', 'कविता स्वामी विवेकानंदाच्या', 'मनाचा संसार' आदी पुस्तके प्रकाशित. १९०१ :- 'टीकाविवेक', 'उमर खय्यामची कैफियत' आदी समीक्षापुस्तके, आधुनिक विवाहपध्दतीतील दोष टिपणारी राक्षसविवाह ही कादंबरी, तसेच 'आधुनिक राष्ट्रवादी रवींद्रनाथ ठाकुर' सारखे चरित्र पुस्तक यांचे लेखक, समीक्षक श्रीकृष्ण केशव क्षीरसागर यांचा जन्म. **१९१५ :-** कथाकार, लेखक, निर्माता दिग्दर्शक दिनकर द. पाटील यांचा जन्म. आतापर्यंत ११० चित्रपटांच्या कथा संवादासह त्यांची कोवळी किरणे', 'शंभर रुपये', 'सूर्याचं चांदणे' ह्या कथासंग्रहासह 'चित्रसंसार', 'दसरा उजाडला', 'पाव्हणा आला रे आला', 'पैसे झाडाला लागतात' ही नाटके, भुताटकीच्या घरात एक रात्र' ही नाटिका, 'माझे शिल्पकार' ही व्यक्तिचित्रे आणि 'मास्टर विनायक दिग्दर्शकांचा दिग्दर्शक' अशी ग्रंथ संपदा. **१९१९ :-** कथा-कादंबरीकार एकनाथ विश्वनाथ जोशी यांचा जन्म. 'काळोखाचे अंग' ही त्यांची वाखणण्याजोगी कादंबरी, तसेच हैद्राबाद मुक्तिसंग्रामावर 'रानभूल' तसेच 'कृष्णकाठचे 'देव', 'विश्वास' या कादंबऱ्यासह निळेगर्द आणि लाल भटक' हा कथासंग्रह प्रसिद्ध. **१९२६ :-** पत्रकार, कथा-कादंबरी लेखक प्रभाकर नारायण पाध्ये तथा भाऊ यांचा जन्म. विविध वृत्तपत्रातून पत्रकारिता करणाऱ्या भाऊंनी फिल्मी पत्रकारितेतही स्वतःच ठसा उमटवला होता. एक सुनहरा ख्याबे', 'मुरगी', 'थालीपीठ', 'थोडीसी जो पीली' हे कथासंग्रह प्रसिध्द. **१९३३ :-** कथा कादंबरी लेखिका रोहिणी कुलकर्णी यांचा जन्म. 'भेटे' या लघुकादंबरीमुळे वाचकांचे लक्ष त्यांच्याकडे वेधले. यावर नाटक आणि चित्रपटही निघाले. 'फलश्रुती' या लघुकादंबरीसह 'गर्भफुल', 'कृतार्थ', 'सातवं दालन' या त्यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. १९३४ :- राष्ट्र-धर्म आदी विषयांचे एक लेखक वामन रामचंद्र जोशी यांचा जन्म. हिंदू धर्माची तत्त्वे सांगणारा 'राष्ट्रीय सनातन धर्मपुस्तक' ह्या ग्रंथासह स्वदेशाभिमान संजीवन', 'सनातन आर्यधर्म ग्रंथ', 'राष्ट्रीय प्रार्थना पुस्तक (स्तोत्र )' आणि 'पद्यग्रंथ' हा राष्ट्रहितोपयोगी स्फूट काव्य संग्रह आदी साहित्य प्रकाशित. **१९३४ :-** नाटककार आणि 'सोलापूर जिल्हा' या स्थलवर्णनात्मक पुस्तकाचे कर्ते वामन गणेश जोशी यांचे निधन. 'संगीत अखंड सौभाग्यदामिनी सत्यवान सावित्री चरित्र', 'संगीत बलिसत्व दर्शन अथवा वामन चरित्र नाटक आणि 'संगीत मालविकाग्निमित्र' हे कालिदासाच्या संस्कृत नाटकाचे भाषांतर मिळून तीन नाटके त्यांनी लिहिली. **१९४२ :-** लेखक बाबूराव रावजी चोले यांचा जन्म. चौफेर भाग १, २ मिळून ५ काव्यसंग्रह. 'सुंदरी', 'प्रेमाचा अर्थ' या कादंबऱ्या आणि तुकडोजी महाराज', 'आमचे मणीराम बाबा' ही चरित्रे अशी साहित्य संपदा. **१९४६ :-** लेखक, नाटयअभिनेते आणि प्राचार्य श्याम मदनराव भुर्के यांचा जन्म. त्यांच्या साहित्य संपदेत 'सभेत कसे बोलावे' मंत्र श्रीमंतीचा', 'माईंड जिम', 'स्टार प्रिन्सिपल', '१०१ प्रासंगिक व्याख्याने', 'क्रेडीट कार्डचे मायाजाल', 'पुणं एक साठवण', 'पु. लं. आनंदयात्रा', 'खुमासदार अत्रे', 'आनंदाचं पासबुक (आत्मवृत्त)', बँकेत शेखर सुमन', 'साहित्य दरबारा तील दशरत्ने', 'मॅनेजमेंट गुरु जगन्नाथ शंकरशेट', 'यशस्वी जीवनाची वाटचाल', 'मुक्काम पोस्ट सोलापूर इ. पुस्तके प्रसिद्ध.

**- संजय वझरेकर**

९९७५५७६६७५

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

६ नोव्हेंबर
१)श्रीम. संध्या अनिल काठे
किहीम, अलिबाग, ६-११-१९५२
२) श्री. रमेश गणपत पाटील
कुरूळ, अलिबाग, ६-११-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. अशोक महादेव पाटील स्मरणार्थ अलिबाग**

# रुग्णांना बांबूच्या झोळीचा आधार

## ■ शहापूर पंचायत समितीचा उदासीन कारभार

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

शहापूर तालुक्यातील दापुरमाळ कार्यक्षेत्रातील खोरगडवाडी आणि ठाकूरपाडा वस्त्यांना दळणवळणासाठी रस्ताच नाही. यामुळे येथील ग्रामस्थांना आजही एखाद्या रुग्णाला उपचारासाठी बांबूच्या झोळीने डोंगरावरून पायपीट करत आणावे लागत आहे. तालुक्यातील कसारा पंचक्रोशीतील तसेच अजनुप ग्रामपंचायत अंतर्गत येणारी खोरगडवाडी आणि ठाकूरपाडा हे दोन पाडे विनारस्त्याचे वसलेली आहेत. तसेच, येथील कुटुंबांना वीज, पाणी, आरोग्य, शिक्षण यासारख्या पायाभूत सुविधा देखील उपलब्ध झालेल्या नाहीत. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही दापुरमाळवासियांना पायाभूत सुविधा उपलब्ध केली जात नसल्याने येथील आदिवासी बांधव तीव्र संताप व्यक्त करत आहेत.




एकीकडे देशाने स्वातंत्र्याची पंचाहत्तरी साजरी केली असताना दुसरीकडे दुर्गम भागातील आदिवासी जनतेला रस्त्यांसाठी झुंजावे लागत आहे. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या वातावरणात मलेरिया, टायफाईड आदी आजारांसह सर्प आणि विंचूदंश झालेल्या रुग्ण संख्येत वाढ होत असते. अशा परिस्थितीत रुग्णांना झोळी करून दवाखान्यात न्यावेच लागते. रस्ताच नसल्याने कुटुंबातील व्यक्ती आजारी पडली तर त्याला दवाखान्यात उपचारासाठी नेण्याचा प्रश्न पडतो. नुकतेच दापुरमाळ येथील आदिवासी पाड्यावरील एका कुटुंबातील सोमी पारधी या महिला आजारी असल्यामुळे त्यांना उपचारासाठी कुटुंबाने बांबूच्या झोळीतून ६ किमीची डोंगर पायवाटेवरून पायपीट करत दवाखान्यात आणले होते.

गेल्या अनेक वर्षांच्या रस्ते मागणीला प्रशासनाकडून ठोस कार्यवाही झालेली नाही. रस्त्याचा प्रश्न भेडसावत असतांना प्रशासनाकडे बोट दाखवले जाते. मात्र, वरिष्ठ स्तरावरून मंजूर रस्त्याबाबत हालचालींचा वेग मंदावल्याने रस्त्याचा प्रश्न रखडला आहे. रस्ता नसल्याने खोरगडवाडी आणि ठाकूरपाडा या दोन वस्त्यांतील ग्रामस्थ नेहमी आजारी रुग्णांला उपचारासाठी बांबूच्या झोळीतून ६ किमीची पायपीट करीत माळ गावापर्यंत आणावे लागते आणि तेथून पुढे सोयीनुसार कसारा किंवा घोटी येथे जावे लागते.

> या रस्त्यासाठी वनविभागाच्या जागेचा प्रश्न पडला होता. परिणामी वनविभागाने जागेचा तिढा सोडवला आहे. तथापि पंचायत समितीच्या रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून या रस्त्याचे काम करणे क्रमप्राप्त होते. मात्र, पंचायत समितीच्या उदासीन कारभारामुळे हा रस्ता आजपावेतो पूर्णत्वास जाऊ शकला नाही. तसेच, वनविभागाने रस्त्यासाठी जागा दिल्यानंतर एक वर्षाच्या आत त्या जागेवर पायाभूत सुविधा न केल्यास ती जागा पुन्हा वनविभाग आपल्या ताब्यात घेत असते.
>
> - प्रकाश खोडका,
> तालुका सचिव, श्रमजीवी संघटना



# प्रकाश गोंजी सेवानिवृत्त

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

बँक ऑफ इंडिया मुरूड शाखेचे मॅनेजर प्रकाश गोविंद गोंजी हे सेवानिवृत्त झाले आहेत. यावेळी बँकेचे नवीन मॅनेजर अमोल जाधव यांच्या हस्ते प्रकाश गोंजी यांच्या कार्याचा सन्मान चिन्ह देऊन गौरवपर सत्कार करण्यात आला. यावेळी कामेश्वर शर्मा, रवी गुप्ता, राम, कृष्णा चोगले, रामचंद्र आरेकर, उत्तम पाटील, रशीद हद्दादी, तुकाराम जाधव, प्रकाश उमरोटकर, ताराचंद जैन, रमेश गोंजी, किसन गोंजी, प्रल्हाद गोंजी, बाळकृष्ण गोंजी, बँकेचे कर्मचार आदी उपस्थित होते. प्रकाश गोंजी हे मूळचे मुरुडचे असल्याने मुरुड परिसरातील ग्राहकांना अतिशय ऊत्तम सेवा देत होते. त्यांच्या सेवानिवृत्त कार्याक्रमात अनेक ग्राहकांनी मनोगत व्यक्त केले. सहकाऱ्यांनी उत्तम ग्राहक सेवेचे व्रत कायम ठेवून बँकेचा नावलौकिक अधिक वृद्धिंगत करावा, अशी अपेक्षा गोंजी यांनी व्यक्त केली. आपल्या सेवा काळात सहकार्य करणाऱ्या सर्व स्टाफ आणि ग्राहकांचे गोंजी यांनी आभार व्यक्त केले.

# पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील संभे ते आळंदी पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन दि. १८ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर या कालावधीत करण्यात आले आहे. या दिंडी सोहळ्याचे उगमस्थान भैरीनाथ मंदिर येथील असून सोमवारी (दि.१८) सकाळी साडेआठ वाजता या दिंडीचे आळंदीकडे प्रस्थान होणार आहे. या दिंडी सोहळ्यात विविध प्रकारचे धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न होणार असून या दिंडीचे पूजनासाठी व दर्शनासाठी अनेक दिग्गज मान्यवर येत असल्याची परंपरा आजही कायम आहे. तर, सोहळ्याचे यशस्वीतेसाठी अध्यक्ष तुकाराम बांदल, उपाध्यक्ष अनंत सानप, सेक्रेटरी पांडुरंग सानप, गणेश नलावडे, खजिनदार जितेंद्र दहिंबेकर, दत्ता तेलंगे आदी पदाधिकारी यांच्यासह दिंडीचे सर्व सदस्य तसेच ज्ञानेश्वर सत्संग वारकरी सेवा मंडळ संभे व ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ व वीर हनुमान क्रीडा मंडळ संभे हे सहकार्य करीत आहेत.

# एसटी थांबत नसल्याने प्रवाशांचे हाल

**। कोलाड । वार्ताहर ।**

ऐन दिवाळीत कोलाड नाक्यावरील एसटी कण्ट्रोलरला रोह्यात बोलविल्याने कोलाडकडे येणाऱ्या एसटी बसेस कोलाड थांब्यावर थांबत नसल्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. मुंबई-गोवा महामार्गावरील कोलाड हे मध्यस्थी ठिकाण असुन येथे मुंबई, रत्नागिरी, गोवा, पुणे, रोहा व अलिबागकडे जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त असते. परंतु, लांब पल्ल्याच्या एसटी बसेस अगोदरच पुर्णपणे भरून येत असतात. यामुळे या एसटी बससे कोलाड थांब्यावर थांबत नसल्याने येथील प्रवाशांचा खोळंबा होत आहे.



तसेच, आंबेवाडी येथील बाजारपेठेतील मुख्य रस्ता उड्डाण पुलाच्या कामासाठी बंद करण्यात आला आहे. यातच जुन्या जागी असणारा एसटी थांबा तोडण्यात आला असून तात्पुरता बाजारपेठेच्या पुढे बांधण्यात आला आहे. यामुळे नवीन येणाऱ्या प्रवाशांना एसटी बससाठी कोठे उभे रहावे, हे लक्षात येत नाही.

# चिपळूणकरांची निरुत्साही दिवाळी

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

यंदा परतीच्या पावसाने कहर केल्यामुळे खरीप हंगामाला फटका बसला आहे. चिपळूण तालुक्यातील २०० शेतकऱ्यांचे सुमारे २७ हेक्टर क्षेत्रांवरील भातशेतीचे नुकसान झाले आहे. ऐन काढणीच्या कालावधीत हातातोंडाशी आलेला घास या पावसामुळे हिरावला गेला. यंदा चांगला पाऊस होऊनही अपेक्षित उत्पादन हाती आलेले नाही. यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी निरुत्साही गेली.



सर्वत्र दिवाळीची धामधूम सुरू असताना चिपळूण तालुक्याला पावसाने झोडपून काढले. पोफळी, शिरगाव परिसरात वीजपुरवठा खंडित झाला होता. वीज पडल्यामुळे इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे जळाली. यामुळे परिसरातील नागरिकांच्या घरात अंधार पसरलेला होता. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सायंकाळी उशिरापर्यंत अनेकांच्या घरात वीज नव्हती. दिवाळी म्हटले की, घरांना रंगरंगोटी केली जाते. यावर्षी शेतकऱ्यांची दिवाळी शेतातच गेली.

तसेच, वीर गावातील ३१ शेतकऱ्यांचे ७.५० हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे. देवपाठमधील २३ शेतकऱ्यांचे ४.६० हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे. या खालोखाल मुंढे, तळसर, शिरगाव, वेहळे, अनारी, कापसाळ या गावातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

> नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे झाले आहेत. तालुक्यात ६५ टक्के भातशेती कापण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांचे पंचनामे झाले नसतील त्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालय किंवा कृषी सहायकांशी संपर्क साधावा.
>
> -शत्रुघ्न म्हेत्रे,
> तालुका कृषी अधिकारी, चिपळूण

## प्रफुल्ला पाटील यांचे निधन

**अलिबाग :** तालुक्यातील रामराज येथील मारोडे गावच्या रहिवाशी प्रफुल्ला रघूनाथ पाटील यांचे मंगळवार दि. २९ ऑक्टोबर रोजी निधन झाले आहे. प्रफुल्ला पाटील शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने दोनवेळा ग्रामपंचायतीत निवडून आल्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, सुना व नातवंडे असा मोठा पाटील परिवार आहे. प्रफुल्ला पाटील यांचे दहावे गुरूवारी (दि.७) पाली येथील श्री क्षेत्र उद्दर रामेश्वर येथे होणार आहेत. तर, तेरावे रविवारी (दि.१०) मारोडे येथील त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याचे पाटील कुटुंबियांकडून सांगण्यात आले आहे.



# माणगाव विकास कॉलनी शाळेतर्फे मतदान जनजागृती रॅली

**। माणगाव । वार्ताहर ।**

स्विप मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा विकास कॉलनी येथे २१ ऑक्टोबर २०२४ ते २६ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत मतदान जनजागृती करण्यात आली. नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा याबाबत जनजागृती म्हणून विकास कॉलनी शाळेतर्फे विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली. रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, केंद्रप्रमुख शंकर शिंदे, सुधा साळवी, शाळेच्या मुख्याध्यापिका येलवे, उपशिक्षिका गायकवाड, शालेय व्यवस्थापन कमिटी, पालक तसेच साधन व्यक्ती प्रज्ञा म्हात्रे यांनी सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.



## विंचू दंशाने विवाहितेचा मृत्यू

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

संगमेश्वर तालुक्यातील मानसकोंड येथील विंचू दंश झालेल्या २६ वर्षीय विवाहितेचा भाऊबीजेच्या दिवशीच मृत्यू झाल्याची दुदैवी घटना घडली आहे. मंजिरी वैभव फेपडे असे या मृत महिलेचे नाव आहे. मंजिरीला विंचू दंश झाल्यानंतर तात्काळ रत्नागिरी जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, तिला अचानक श्वसनाचा त्रास जाणवू लागल्याने डॉक्टरांनी तिला कोल्हापूर येथे हलवण्यास सांगितले होते. कोल्हापूर येथे उपचारासाठी नेत असतानाच तिचा मृत्यू झाला. तच्या मृत्यूमुळे मानसकोंड गावावर शोककळा पसरली आहे. तिला दीड वर्षाची मुलगी आहे.

# १ लाख ४३ हजार मतदार वाढले

**। पालघर । प्रतिनिधी ।**

पालघर जिल्ह्यातील सहा विधानसभा क्षेत्रांमध्ये मतदार संख्या २२ लाख ९२ हजारांवर पोचली असून अखेरच्या तीन दिवसांमध्ये तब्बल २६ हजार मतदारांची वाढ झाली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर जिल्ह्यात १ लाख ४३ हजार ५५२ मतदार वाढले असून नालासोपारा आणि बोईसर विधानसभा क्षेत्रातील मतदारांची वाढ लक्षणीय झाली आहे.



पालघर जिल्ह्यात ११ लाख ८७ हजार ५८९ पुरुष, ११ लाख ४ हजार महिला आणि २३१ तृतीयपंथी मतदार असून नालासोपारा मतदार संघामध्ये सर्वाधिक ६ लाख ८ हजार पेक्षा अधिक मतदार आहेत. या खालोखाल बोईसर मतदार संघात ४ लाख ११ हजार, वसई विधानसभा क्षेत्रात ३ लाख ५४ हजार, विक्रमगड मतदारसंघात ३ लाख १७ हजार, डहाणू विधानसभा क्षेत्रात ३ लाख १ हजार तर पालघर विधानसभा क्षेत्र २ लाख ९८ हजार मतदार आपला हक्क बजावू शकणार आहेत.

### ४६ हजार नवे मतदार

**जिल्ह्यात ४६ हजार नव मतदारांची नोंदणी झाली असून २० ते ४९ वयोगटात तब्बल ६६ टक्के मतदार नोंदवले गेले आहेत. नोंदवलेल्या मतदारांपैकी १७ हजार ४३२ मतदार अपंग आहेत. याचप्रमाणे सैन्यामध्ये कार्यरत असणारे ३२६ मतदार असून त्यापैकी विक्रमगड मध्ये १२१ तर नालासोपारामधील ८३ सैन्यातील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.**

# भातपीक उत्पादनांचे निरीक्षण कार्यक्रम

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

संगमेश्वर तालुक्यातील लावेले येथील श्री स्वामी समर्थ मठाते भात पिक उत्पादनाचे निरीक्षण करण्यात आले. याआधी किसान क्राफ्ट कंपनी बंगलोरचे बियाणे नमून्याकरता शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले. आशिष भिडे यांनी लावलेल्या १००७ ही भात पीक जात १२५ ते १३० दिवसात कापण्यात आली. त्याचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांसोबत घेण्यात आले. तसेच, या कार्यक्रमात शेतकरी बांधवांना किसनक्राफ्ट फाउंडेशन मार्फत उत्तेजनार्थ बक्षीस वाटप करण्यात आले. प्रथम बक्षीस आशिष भिडे, दृतिय बक्षीस अनंत पाध्य, तृतीय बक्षीस शांताराम जाधव यांना देण्यात आले.



# मुख्यमंत्र्यांचे ठाणे प्रदूषणाच्या विळख्यात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

यंदा राज्यासह देशात दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. तसेच, दिवाळीच्या चार ते पाच दिवसांत लखलखाट पाहायला मिळाला. तर, फटाक्यांची आतिषबाजी देखील मोठ्या प्रमाणात करण्यात आली होती. यामुळे आता हवेतील प्रदुषणात कमालीची वाढ झाली आहे. यंदाच्या वर्षी फटाक्यांचा आवाज जरी कमी झाला असला तरी मुंबई, ठाणे सारख्या शहरांना वायु प्रदुषणाचा विळखा बसत असल्याची माहिती तज्ज्ञांकडून देण्यात आली आहे.

यंदा दिवाळीच्या या चार दिवसांत फटाक्यांमुळे प्रदूषणात आणखीन भर पडल्याचे निरीक्षण डॉ. महेश बेडेकर यांनी नोंदविले आहे. तर, सर्वाधिक प्रदुषणे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातील घोडबंदर रोडवर झाल्याचे निदर्शनात आले आहे. या ठिकाणी फटाक्यांचे आवाज आणि वायू प्रदूषण अधिक असल्याची माहिती समोर येत आहे. यातच मुंबईत वाऱ्याचा वेग कमी झाल्यामुळे हवेतील प्रदुषण झपाट्याने वाढू लागले आहे. यामुळे आता फुफ्फुसाच्या संसर्गाच्या रुग्णांमध्ये २० टक्क्यांनी वाढ झाल्याने डॉक्टर काळजी घेण्याचा सल्ला देत आहेत.

हवेतील प्रदुषणावर नियंत्रण आणण्यासाठी प्रशासन अनेक उपाययोजना राबवण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र, महापालिकेचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरत आहेत.

## राज्यात ४ हजार ७६७ जणांना नेमणुकांचे आदेश

# कार्यशिक्षणासाठी अंशकालीन निर्देशक

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

**जिल्हा परिषदेच्या ज्या शाळांची (सहावी ते आठवीच्या वर्गाची) पटसंख्या १०० पेक्षा जास्त आहे, त्याठिकाणी आता कला, शारीरिक शिक्षण व आरोग्य आणि कार्यशिक्षणासाठी अंशकालीन निदेशक नेमला जाणार आहे. शालेय शिक्षण विभागाने राज्यात ४ हजार ७६७ जणांना नेमणुका देण्याचे आदेश काढले आहेत. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर त्या सर्वांची नियुक्ती केली जाणार आहे.**

जिल्हा परिषदेच्या शाळांमधील उच्च प्राथमिक वर्गातील विद्याध्यांना कला शिक्षण, आरोग्य कार्यानुभव, क्रीडा याविषयाचे ज्ञान व्हावे, विद्यार्थ्यांचे आरोग्य सदृढ राहावे, त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणून अंशकालीन निदेशक किंवा अतिथी निदेशक नेमण्याचा निर्णय यापूर्वी झाला आहे. पण, काही कारणांमुळे त्यांची सेवा खंडित करण्यात आली होती. यामुळे अनेकांनी उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. न्यायालयाच्या आदेशानुसार इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गासाठी अंशकालीन निदेशक नेमण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे.



दरमहा सात हजार रुपयांच्या मानधनावर अंशकालीन निदेशक नेमले जाणार असून, त्यांच्या नेमणुकांमुळे पुस्तकी ज्ञानाशिवाय कला, क्रीडा, कार्यानुभव, आरोग्य अशा विषयांवरील माहिती मिळणार आहे. पण, विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या एक दिवस अगोदर हा निर्णय निघाल्याने त्या निदेशकांच्या नेमणुकांसाठी आणखी काही दिवस वाट पहावी लागणार आहे.

### निवडणुकीनंतरच मिळणार नेमणुका

**शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी १४ ऑक्टोबरला अंशकालीन निदेशक, अतिथी निदेशकांना नेमणुका द्याव्यात, असे आदेश काढले. पण, दुसऱ्याच दिवशी आचारसंहिता लागू झाल्याने त्यांच्या नियुक्त्या आता निवडणुकीनंतरच दिल्या जाणार आहेत. तत्पूर्वी, आदेश निघाल्यापासून ४५ दिवसांत पूर्वीपासून अंशकालीन निदेशक शाळांवर कार्यरत होते, त्याच शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीकडे अर्ज करावा.**

# मनुष्यबळाची दुसरी सरमिसळ

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी सामान्य निवडणूक निरीक्षक रुही खान, सतिश कुमार एस आणि जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील मनुष्यबळाची दुसरी जिल्हास्तरीय सरमिसळ (रँडमायझेशन) प्रक्रिया करण्यात आली.**



जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या सरमिसळ प्रक्रियेच्यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रविंद्र शेळके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी निलेश लांडगे आदि उपस्थित होते.

जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघाच्या आवश्यकतेनुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीकरिता एकूण २हजार ८२० मतदान केंद्रा करीता १४ हजार २१६ इतकी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. जिल्ह्यात उपलब्ध कर्मचारी संख्या १५ हजार १६९इतकी आहे. या सर्व कर्मचाऱ्यांची सरमिसळ प्रक्रिया करण्यात आली.

पनवेल विधानसभा मतदार संघात एकूण ६०४ मतदान केंद्र असून ३ हजार ७४ कर्मचारी आवश्यक आहे. या मतदार संघांसाठी ३ हजार ४८७ मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

कर्जत विधानसभा मतदार संघात एकूण ३६२ मतदान केंद्र असून १ हजार ९३४ कर्मचारी आवश्यक आहे. या मतदार संघांसाठी १ हजार ९६१ मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

उरण विधानसभा मतदार संघात एकूण ३५५ मतदान केंद्र असून १ हजार ८६९ कर्मचारी आवश्यक आहे. या मतदार संघांसाठी १ हजार ८९३ मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

पेण विधानसभा मतदार संघात एकूण ३८० मतदान केंद्र असून २ हजार २४ कर्मचारी आवश्यक आहे. या मतदार संघांसाठी २ हजार ३६० मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.अलिबाग विधानसभा मतदार संघात एकूण ३७५ मतदान केंद्र असून १ हजार ९८३ कर्मचारी आवश्यक आहे. या मतदार संघांसाठी १ हजार ९९२ मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. श्रीवर्धन विधानसभा मतदार संघात एकूण ३५१ मतदान केंद्र असून १ हजार ६५८ कर्मचारी आवश्यक आहे. या मतदार संघांसाठी १ हजार ७३४ मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.महाड विधानसभा मतदार संघात एकूण ३९३ मतदान केंद्र असून १ हजार ६७४ कर्मचारी आवश्यक आहे. या मतदार संघांसाठी १ हजार ७४० मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## सिडकोच्या २६ हजार घरांच्या अर्ज नोंदणीसाठी अखेरचे ७ दिवस

**। नवी मुंबई । वार्ताहर ।**

सिडकोच्या महागृहनिर्माण योजनेला चांगला प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत ६८ हजार इच्छुकांनी या महागृहनिर्माणात घर मिळावे यासाठी अर्जनोंदणी केली आहे. ११ नोव्हेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज नोंदणीची अखेरची मुदत सिडकोने जाहीर केल्यामुळे अखेरचे सात दिवस इच्छुकांसाठी शिल्लक आहेत.

म्हाडाने नुकत्याच काढलेल्या २ हजार घरांच्या सोडतीमध्ये तब्बल १ लाखांहून अधिक अर्जदारांनी सहभाग घेतला होता. मात्र सिडको महामंडळाने दस-याच्या मुहूर्तावर माझे पसंतीचे सिडकोचे घर या २६ हजार घरांच्या जाहीर केलेल्या महागृहनिर्माण योजनेतील घरांच्या किंमती अजूनही जाहीर न केल्याने इच्छुकांमध्ये संभ्रम कायम आहे. पहिल्याच दिवशी या योजनेत २४ तासांतच १२,४०० ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यामुळे सर्वाधिक अर्जनोंदणी होईल अशी अपेक्षा सिडकोच्या पणन विभागाला होती. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) व अल्प उत्पन्न गटासाठी (एलआयजी) या दोन उत्पन्न गटात सिडकोचे संकेतस्थळ https:\.cidcohomes.com यावर हे अर्ज नोंदणी होत आहेत. नवी मुंबईच्या विविध उपनगरांमध्ये सिडको मंडळाने ६७ हजार घरांचे बांधकाम हाती घेतले आहे. याच घरांपैकी पहिल्या टप्प्यांतील २६ हजार घरे ग्राहकांना उपलब्ध केली आहेत.

### सोडतीची वैशिष्ट्ये

**ही योजना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटांसाठी असून, प्रधान मंत्री आवास योजनेच्या अनुदानाचा लाभही घेता येईल. योजनेविषयी सर्वप्रकारची माहिती सिडकोच्या https:\. cidcohomes.com संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

## सिंधुदुर्ग संघाच्यावतीने तारांगणच्या मुलांना सहाय्य

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

'तारांगण निवासी कार्यशाळा', शिरवली, मुरबाड या संस्थेतील मतिमंद मुलांच्या कलेला प्रोत्साहन आणि आर्थिक सहाय्य व्हावे यासाठी सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ या संस्थेने पुढाकार घेतला. या शाळेतील मतिमंद मुलांनी आकर्षक पणत्या बनविल्या होत्या. आणि त्या पणत्या, रांगोळी व उटणे असा एक पूर्ण संच बनवला होता. या संस्थेला शासनाकडून कोणतेही अनुदान मिळत नाही. यासाठी त्यानी तयार केलेले हे संच विक्री करण्यासाठी संघाने पुढाकार घेतला. आपल्या सभासदांमार्फत त्याची विक्री करून तारांगण संस्थेला सहाय्य केले.

प्रिया खोबरेकर व प्रशांत खोबरेकर या सभासद दांपत्याने पुढाकार घेवून मुलांची दिवाळी आनंदात साजरी होण्यासाठी मदत केली. या कार्याला संघाचे अध्यक्ष केशवराणे, बाबाजी नेरुरकर, रामचंद्र मोचेमाडकर, अशोक चव्हाण, वासुदेव सावंत या कार्यकर्त्यांनी हातभार लावला. तारांगण मतिमंद शाळेचे संचालक विकास म्हारसे यांनी मफ्आत्ता पर्यंतची या संचांची सर्वात विक्रमी विक्री करून मोलाचे सहाय्य केल्याबद्दल सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघाचे विशेष पत्र देऊन आभार मानले.

संघाच्या सदस्य परिवारानी उस्फूर्तपणे या उपक्रमात सहभागी होऊन एक चांगला आदर्श समाजासमोर ठेवला आहे आहे. अशी प्रतिक्रिया सिंधुदुर्ग संघाचे ज्येष्ठ सल्लगार रामकृष्ण परब यांनी दिली.

## झोमॅटो डिलेव्हरी बॉय बेपत्ता

**। पनवेल । वार्ताहर ।**

राहत्या घरातून झोमॅटो डिलेव्हरी बॉयचे काम करण्यासाठी गेलेला एक इसम अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. हमीदउल्ला जाऊल्ला खा असे या इसमाचे नाव असून रंग सावळा, उंची अंदाजे ५ फुट ६ इंच, अंगाने मध्यम, चेहरा गोल, नाक सरळ, डोळे काळे असून अंगात गुलाबी रंगाचा हाफ शर्ट व हाफ पॅन्ट, पायात निळ्या रंगाची चप्पल, मानेवर डाव्या बाजूस जुनी जखम व डाव्या कानावर कट झालेली खुण आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खारघर पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार नितीन आखाडे यांच्याशी संपर्क साधावा.

## संवेदना फाऊंडेशनतर्फे कुष्ठरोगींना शैक्षणिक साहित्य

**। पनवेल । वार्ताहर ।**

भारतीय सैन्यदलातील शौर्यचक्र विजेते युद्धवीर मधुसूदन सुर्वे आणि लेफ्टनंट कर्नल संतोष मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पनवेल शांतीवन येथील कुष्ठरोगी आणि वृद्ध बांधवांसमवेत सहभोजन, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य, महिलांना साडी वाटप करून संवेदना फाऊंडेशनतर्फे दिवाळी साजरी करण्यात आली.

यावेळी मराठा मंदिरचे उपाध्यक्ष विलासराव देशमुख, माजी पोलीस निरीक्षक अविनाश सोनकर, कस्टम अधिकारी सत्यवान रेडकर, कुष्ठरोग समितीचे सामाजिक कार्यकर्ते संतोष ढोरे, संवेदना फाऊंडेशनचे अध्यक्ष विनोद चाळके, ॲड. रंजना खोचरे, गायक किशोर गवांदे, पोलीस निरीक्षक रवींद्र दुशारेकर, सिने अभिनेत्री ईश्वरी शेट्ये, अभिनेता मितेश आगणे, सहारा अकादमीचे एस पवार, शांतीवनचे सीईओ नंदवुमार उरणकर, समाजसेवक एकनाथ भिसे, राजेन्द्र वोरा आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी शौर्यचक्र विजेते युद्धवीर मधुसूदन सुर्वे आणि लेफ्टनंट कर्नल संतोष मोरे यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार श्रीकांत जाधव यांनी केले. करुणेश्वर वृद्ध आश्रमातील बांधवांना भेट देऊन त्यांच्या समवेत गाणी सादर करण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे उपाध्यक्ष अमोल खैरे, अशोक राजपुरोहित, कमलेश कुबल, कुष्ठरोग समितीचे संतोष ढोरे, ईश्वर, करुणा ढोरे यांनी अथक परिश्रम घेतले.

## पनवेल तालुका वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी गजानन घाडगे

**। पनवेल । वार्ताहर ।**

नुकताच विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात परिमंडळ १ व परिमंडळ २ मधील वपोनि तसेच पोनि अधिकारी वर्गाच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्या बदल्यांच्या अनुषंगाने आज अनेक नवीन अधिकाऱ्यांनी वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात आपला पदभार स्वीकारला आहे.



त्यामध्ये पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या वपोनि पदी गजानन घाडगे तर पो.नि.पदी आनंद कांबळे, खारघर पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी शितल पाटील, खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी सचिन परदेशी, कोपर खैरणे पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी नरेंद्र डंबाळे, तळोजा पोलीस ठाण्याच्या पो. नि.पदी सागर निकम, नेरुळ पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी पंकज घाडगे, पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी अभिजीत अभंग, तुर्भे पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी सतीश चाबुकस्वार, नेरुळ पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी संजय लाड, रबाळे पोलीस ठाण्याच्या पो. नि.पदी श्याम बनसोडे, सीबीडी पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी संजय परदेशी, उरण पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी शरद जाधव, एनआरआय पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी मनोहर पगार, वाहतूक शाखा पो.नि.पदी मोहनी लोखंडे, वाशी पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी जहांगीर मुलाणी, विशेष शाखा पो. नि.पदी कल्पना किरण जाधव-बत्तासे, रबाळे पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी संजय वेदपाठक, पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी शाकीर मुसा पटेल, कळंबोली पोलीस ठाण्याच्या पो. नि.पदी अयाज युसूफ पटेल यांची नेमणूक नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलींद भारंबे यांनी केली आहे.



● मुरूड गांरबी परिसरात भातशेती झोडणीची कामे जोरात चालु आहेत तर काही ठिकाणी झोंडून रचून त्यावर बुजगावणे उभारले आहेत.

## पीएचडीसाठीची 'पेट' परीक्षा इतिहासजमा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे नियमित विद्यार्थ्यांनाच पीएचडीसारख्या संशोधनासाठीची द्वारे खुली होणार आहेत. यामुळे काही कारणास्तव परीक्षा देऊ न शकलेले अथवा जुन्या अभ्यासक्रमांनुसार पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना पीएचडीचा पर्याय कायमचा बंद होणार आहे. त्यामुळे मुंबई विद्यापीठाकडून पीएचडीच्या प्रवेशाची प्रवेश पात्रता परीक्षा (पेट) ही इतिहासजमा होणार आहे.

मुंबई विद्यापीठाची पेट परीक्षा १७ नाव्हेंबर रोजी होणार आहे. मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या या परीक्षेसाठी ७६ केंद्रांवर व्यवस्था केली गेली आहे.

सकाळी १०.३० ते दुपारी १२.३० या दोन तासांच्या कालावधीसाठी होणाऱ्या परीक्षेसाठी अर्धा तास अगोदर उमेदवारांनी केंद्रांवर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. तर, परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी अर्ज भरले नसल्याने विद्यापीठाने ४ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

### ऑनलाईन सेंटर बेस्ड टेस्ट

**मागील पेट परीक्षेत सर्वसाधारण सहा हजार विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यावेळी मुंबई विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील सातही जिल्ह्यांत ही परीक्षा होणार असून ऑनलाईन सेंटर बेस्ड टेस्ट स्वरूपाची पेट परीक्षा घेतली जाणार आहे.**

### या ठिकाणी करा अर्ज

**मुंबई विद्यापीठातर्फे पीएचडीच्या प्रवेशपूर्व पेट परीक्षेसाठी २६ ऑक्टोबरला वेळापत्रक जाहीर केले आहे. ही परीक्षा ऑनलाईन सेंटर बेस्ड टेस्ट (सीबीटी) पद्धतीने घेतली जाणार आहे. तसेच, विद्यापीठाचे संकेतस्थळ www.mu.ac.in आणि https://uompet २०२४.formsubmit.in/ येथे अर्ज करण्यासाठीची सर्व माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

## ४७ लाखांची ऑनलाईन फसवणूक

**। पनवेल । वार्ताहर ।**

ब्लॉक ट्रेडिंगमध्ये मार्केटपेक्षा २० ते ३० टक्के कमीदराने स्टॉक ट्रेडिंग करून मिळेल असे खोटे सांगून ४७ लाख ८७ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

पारथा मुखर्जी हे खारघर येथे राहत असून त्यांना शेअर मार्केटमध्ये ऑनलाईन ट्रेडिंग करायची सवय आहे. त्यांना फेसबुक अकाउंटवर एका कंपनीच्या नावाचे पेज दिसले. त्यावेळी ब्लॉक ट्रेंडिंग मध्ये मार्केट पेक्षा २० ते ३० टक्के कमी दराने स्टॉक ट्रेडिंग करून मिळेल असे नमूद केले होते. त्या पेजवर क्लिक केले असता व्हाट्सअप ग्रुप ओपन झाला. त्यानंतर व्हॉट्सॲप ग्रुपचा ॲडमिन, त्याचा असिस्टंट, कस्टमर सर्विस धारक, आणि कंपनीचे हेड समिक दास शर्मा यांनी संगणमत करून मुखर्जी यांना आयपीओ ट्रेडिंगच्या गुंतवणुकीवर रजिस्ट्रेशन नंतर ओपन झालेल्या पेजवर वाढीव रक्कम जमा झाल्याचे भासवले आणि वेगवेगळ्या बँक खात्याची माहिती पाठवून त्यावर ४७ लाख ८७ हजार १०० रुपये ऑनलाईन ट्रान्सफर करण्यास सांगितले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पैसे परत मागितले मात्र पैसे परत दिले नाहीत.

## सोन्याची चैन हातातून हिसकावली

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

सोन्याची चैन हिसकावून नेल्याप्रकरणी रवी घुले त्याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रकाश शर्मा हे पनवेल आनंदनगर येथे राहत असून ते एमजी रोड टपाल नाका येथे किरण ज्वेलर्स येथे नोकरी करतात. पाच महिन्यांपूर्वी रवी घुले हा दुकानात आला आणि वजन काटा व ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असल्याचे सांगितले. यावेळी दहा ग्राम सोन्याची चैन बनवण्याची ऑर्डर देऊन दोन चार दिवसांनी पैसे देऊन चैन घेऊन गेला. त्यानंतर दर महिन्याला तो सोन्याचा भाव काय आहे असे फोनवरून विचारायचा. रवी घुले यांनी तीन तोळ्यापर्यंत सोन्याची चैनच्या डिझाईनचे फोटो व्हाट्सअप वर पाठवण्यास सांगितले. ते फोटो पाठवले. त्यानंतर तीन नोव्हेंबर रोजी सुनील सुखवाल व मनीष शर्मा हे दुकानात कस्टमर नसल्याने व्यवसायाबद्दल चर्चा करत होते. त्यावेळी रवी घुले दुकानात आला आणि त्याने पाठवलेल्या फोटो यातील सोन्याची चैन दाखवण्यास सांगितली. चार चेन दाखवले असता एक पसंत करून त्याने किमतीबाबत त्याच्या मामाला बोलायला सांगितले. यावेळी घुले याच्या मामाने चेन तुमच्या माणसासोबत पाठवून द्या त्याच्याकडे एक लाख रुपये देतो आणि बाकीचे गुगल पे करतो असे सांगितले. यावेळी सुनील सुखवाल यांच्याकडे तीन तोळे वजनाची चैन आणि एक्टिवा गाडी दिली. ही गाडी रवी घुले चालवत व सुनील मागे बसून घेऊन गेले. काही वेळाने रवि घुले यांनी सुनील याच्या हातातील सोन्याच्या चेनची पिशवी हिसकावली आणि एक्टिवा गाडी घेऊन चिंचपाडा ब्रिज घालून कळंबोलीच्या दिशेने पळून गेला. पाठलाग केला असता ऍक्टिवा गाडी कळंबोली कडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला लावलेली दिसून आली. रवी घुलेच्या मोबाईलवर फोन लावला असता फोन बंद येत होता. दोन लाख ३१ हजार रुपयांची चैन नेल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

## इसम बेपत्ता

**पनवेल :** खारघर परिसरातून एक इसम राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सिद्धार्थ कांबळे असे या इसमाचे नाव असून अंगाने सडपातळ, रंग सावळा, उंची ६ फुट १ इंच, चेहरा उभट, केस काळे, डोळे बारीक, नाक सरळ असून अंगात पिझा हॉट कंपनीचा टी-शर्ट व निळ्या रंगाची पॅन्ट तसेच पायात काळ्या रंगाचे शुज आहेत. त्याला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने खारघर पोलीस ठाणे किंवा पो.हवा.पी.पी. पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

## रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन तर्फे दिवाळी फराळ वाटप



**। पनवेल । वार्ताहर ।**

रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन तर्फे स्वप्नालय बालगृह मुलींचे वसतीगृह येथे दिवाळी फराळ वाटप करण्यात आले.यावेळी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी क्लबचे अध्यक्ष चारुदत्त भगत, सचिव तुषार तटकरी, रो. विजय मेढेकर, इनव्हील क्लब अध्यक्षा शुभदा भगत आदि उपस्थित होते.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● प्रथम पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

● अनुभवी/विना-अनुभवी सिव्हील सुपरवायझर पाहिजेत. ९४२३३७७५७२/९०२८४९३४३४

● अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी आवश्यक आहेत. पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात. संपर्क : ९९२३७५०५४९ वेळ : सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत

● नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. अकाऊंटंट (पेमेंट - १२०००) २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२

● वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत १० वी १२ वी पास/नापास पगार १२००० रूपये १२ तास ड्युटी ठिकाण- बामणसुरे, चोंढी नंबर- ९१४५४५०२९७/ ९५७९२५८८९२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्थेचा उपक्रम

## आदिवासी पाड्यावर 'दीपोत्सव'

**। पनवेल । वार्ताहर ।**

दोन वेळच्या जेवणासाठी काबाडकष्ट व घाम गाळणाऱ्या आदिवासी वाड्यापाड्यांवर सण उत्सव साजरा होतोच असे नाही. त्याला दीपावलीचा सण सुद्धा अपवाद ठरत नाही. आकाश कंदील आणि दिव्यांचा तर विषयच उरत नाही. आणि गोडधोडाचा सुगंध सुद्धा फारसा येत नाही. या पार्श्वभूमीवर माणुसकीच्या दृष्टिकोनातून संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या माध्यमातून करंजाडे येथील मोकरी आदिवासी वाडीवर सामाजिक दिवाळी साजरी केली. त्यांनी या माध्यमातून खऱ्या अर्थाने बांधिलकी जपत आदर्श वस्तूपाठ ठेवला. दीपोत्सवाने हा पाडा खऱ्या अर्थाने प्रकाशात न्हावून गेला.

पनवेल परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लवकरच टेकऑफ करणार आहे. मुख्यमंत्र्यांनी उपमुख्यमंत्र्यांचे उपस्थितीमध्ये आचारसंहितेच्या अगोदर लष्कराच्या विमानाचे लँडिंग आणि उड्डाण सुद्धा झाले. आजूबाजूला टोलेजंग इमारती उभ्या राहिला आहेत. असे असले तरी आजही आदिवासी वाड्या-पाड्यांवर विकास पोहचला नाही. त्यांच्या एक प्रकारे पाचवीला पुंजलेल्या गरिबीचे समूळ उच्चाटन झाले नाही. अन्न,वस्त्र, निवारा या गरजासुद्धा त्यांना पूर्ण करता येत नाहीत. शिक्षण आरोग्य या गोष्टी त्यांच्यासाठी दूरच आहेत. सण उत्सव आणि त्यांचा फारसा संबंध येत नाहीत. कारण रोजच्या जगण्यामध्ये संघर्ष शिवाय त्यांना दुसरे सोबती नाही.

या सर्व गोष्टींचा विचार करून संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या संस्थापिका वैशाली जगदाळे यांनी विमानतळापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या करंजाडे येथील मोकरी आदिवासी वाडीवर दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार येथील १५० कुटुंबांना फराळ वाटप करण्यात आले. त्याचबरोबर त्यांना रवा, मैदा आणि वनस्पती तूप देण्यात आले. मुलांसाठी बिस्किट सुद्धा नेण्यात आले होते. यावेळी करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार, पल्लवी एरंडे, छाया भोसले, नाथा धारवाड, राज इंगळे, संकल्प जगदाळे उपस्थित होते.

### दिव्यांनी आदिवासीवाडी तेजोमय!

**संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या माध्यमातून शेकडो दिवे मोकरी आदिवासी वाडीवर लावण्यात आले. शुभ दीपावली असा संदेश देत हा परिसर पूर्णपणे तेजोमय करण्यात आला. त्याचबरोबर या वाडीवर आकाश कंदील लावून आनंद अधिक उजळून निघाला. अनेक वर्षांपासून आम्ही या ठिकाणी वास्तव्यास आहे. परंतु यंदा दीपावलीचा सण साजरा करता आला अशी प्रतिक्रिया येथील रहिवाशांनी दिली.**

# आदिवासी बांधवांची दिवाळी गोड

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

**तिमिरातुनी तेजाकडे नेणारा सण म्हणजे दिवाळी, मात्र दिवाळीचा आनंद सर्वांनाच घेणे शक्य नसते. आदिवासी वाड्यापाड्यांवर तर दिवाळीचा फराळ व रोषणाई फारच दुर्मिळ. म्हणूनच जिल्ह्यातील आदिवासी वाड्यापाड्यांवर आनंद व रोषणाई पोहोचविण्यासाठी आणि त्यांची दिवाळी आनंदी गोड करण्यासाठी अनेक सामाजिक संस्था, संघटना, समाजसेवक व दाते पुढे सरसावले.**



सुधागड तालुक्यातील ठाणाळे आदिवासीवाडी, नाडसूर आदिवासीवाडी, बहिरमपाडा आदिवासीवाडी, धोंडसे आदिवासीवाडी या आदिवासीवाडी वरील शेकडो आदिवासी बांधवांची दिवाळी गोड व प्रकाशमय व्हावी म्हणून पणत्या, तेल, उठणे, मोती साबण, विविध प्रकारची मिठाई अशा शेकडो किटचे वाटप करण्यात आले.

नाडसूर येथील संदेश शेवाळे व त्यांच्या पत्नी सई शेवाळे यांनी हा विधायक उपक्रम राबवून आदिवासी बंधू-भगिनी व त्यांच्या मुलांना दिवाळीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी उज्वला पवार, संतोष चव्हाण, सदस्य दिलीप खंडागळे, लक्ष्मण खंडागळे, नथुराम भोईर, सेवानिवृत्त सैनिक संदेश बारस्कर, जितेश खंडागळे, शंकर शेवाळे, स्वप्नील शेळके, नागेश ठकोरे, सुरेश मांढरे, चंद्रकांत फाटे, संदीप पवार, परशुराम शेवाळे, मिथुन खंडागळे, रोशन कडू आदींसह आदिवासी बांधव उपस्थित होते.

गोरख पाटील मित्र परिवार मुंब्रा यांच्यावतीने सुधागड तालुक्यातील उध्दर येथील रामेश्वर वाडीतील कुटुंबांना दिवाळी भेट व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. गोरख पाटील मित्र परिवार मुंब्रा यांच्या वतीने उद्धर रामेश्वर वाडी येथील ५० कुटुंबांना दिवाळी सणानिमित्त साहित्य भेट देण्यात आले. ५० ब्लँकेट, ६३ सहावारी साड्या, १५ नऊवारी साड्या, मिठाई बॉक्स यांचे वाटप करण्यात आले. तसेच अंगणवाडी व शाळेतील ५० विद्यार्थ्यांना टि-शर्ट , शुज तसेच शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला गोरख पाटील मित्र परिवार मुंब्रा यांचे संस्थापक अध्यक्ष गोरख पाटील, आयुब शेख, शंकर विश्वकर्मा, इरफान सरगुरोह व शिक्षक उल्हास केदारी उपस्थित होते. तर पाली शहरातील नागरिकांनी आपले जुने पण सुस्थितीत असलेले शेकडो कपडे गोळा केले. आणि येथील सामाजिक कार्यकर्ते अमित निंबाळकर यांनी हे सर्व कपडे माणगाव तालुक्यातील साजे आदिवासी वाडीवरील ग्रामस्थांना वाटप केले.

# ‘अक्षरमाया’ तर्फे व्यावसायिक सॉफ्टवेअर प्रात्यक्षिक

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

एसएनडीटी महिला विद्यापीठाचे महर्षी कर्वे आदर्श महिला महाविद्यालय, श्रीवर्धन व ‘अक्षरमाया’ खाागी मर्यादित यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ. डी.पी.राणे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी ‘व्यावसायिक सॉफ्टवेअर प्रात्यक्षिक’ हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली. त्यानंतर प्राचार्य डॉ.डी.पी. राणे यांनी अक्षरमाया खासगी मर्यादित या कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या आदित्य जैसवाल व निमीड या संस्थेमध्ये कार्यरत असलेले रिझवान यांचे स्वागत केले. या कार्यक्रमात अक्षरमाया खासगी मर्यादित या कंपनीतर्फे आदित्य जैसवाल यांनी अक्षरमाया कंपनीमध्ये सुरु असलेल्या विविध व्यावसायिक सॉफ्टवेअरची ओळख व त्यांची कार्यपद्धती सांगितली. या कार्यक्रमासाठी निमीड या संस्थेमध्ये कार्यरत असलेले रिझवान सरही उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. ऋषिकेश चोगले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी समीर रिसबूड हिने केले. यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.पी. राणे यांनी या कार्यक्रमाचे महत्त्व विद्यार्थिनींना सांगितले. यानंतर युक्ता माने हिने सर्व मान्यवर, महाविद्यालयचे प्राचार्य डॉ.डी. पी. राणे यांचे, तसेच कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या शिक्षक, शिक्षेकेतर कर्मचारी व उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थिनींचेदेखील आभार मानले. कार्यक्रमाचा शेवट राष्टगीताने झाला.

## दि रेवदंडा को-ऑप. अर्बन बँक लि.

**मुख्य कार्यालय: रेवदंडा, जिल्हा रायगड- ४०२२०२**

**- पाहिजेत-**

**(जाहिरात कोड क्र. १२२/२०२४-२५)**

महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्हा कार्यक्षेत्रात एकूण ०४ शाखांद्वारे कार्यरत असलेल्या व सुमारे १७०.०० कोटी रुपयांचा व्यवसाय असणाऱ्या रायगड स्थित दि रेवदंडा को-ऑप. अर्बन बँक लि. या नागरी सहकारी बँकेत ‘मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापक - केंद्रिय कार्यालय, माहिती व तंत्रज्ञान विभाग प्रमुख व कनिष्ठ लिपिक’ या पदाकरिता दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन लि., मुंबई यांचे माध्यमातून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. यासंदर्भातील अधिक तपशीलाकरिता : http://www.mucbf.in/ या वेबसाईटला भेट द्या. कनिष्ठ लिपिक पदाकरिता परीक्षा शुल्क रु. ९५०/- अधिक १८% जी.एस. टी. असे एकूण रु. १.१२१/- राहील, तथापि मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापक- कार्यालय, माहिती व तंत्रज्ञान विभाग प्रमुख या पदाकरीता केवळ अर्ज मागविण्याचे शुल्क रु. ५००/- अधिक १८% जी. एस. टी. असे एकूण रु. ५९०/- राहील. सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज ऑनलाईन पद्धतीने दि. ०६/११/२०२४ पासून ते २०/११/२०२४ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत भरुन पाठवावेत.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेंत येते की, आमचे अशिलांनी सौ. नंदिनी नरेंद्र भोपी, रा. घर क्र.२३, रेल्वे फाटकाजवळ, मु. पो. सोमाटणे, ता. पनवेल, जि. रायगड यांचेकडून त्यांचे मालकीची मौजे खानंद, तालुका कर्जत, जि. रायगड येथील खाली नमूद केलेप्रमाणे शेतजमीनींची मिळकत कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे खानंद, तालुका कर्जत, जि. रायगड येथील मिळकतींचे वर्णन :**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. = पै. |
|---|---|---|
| १७/१२/अ | ०-४०-०० | ०० = ३८ |
| पैकी पश्चिमेकडील | ०-२०-०० | ०० = १९ |

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली शेतजमीनींची मिळकत तीमधील दगडमाती, झाडझाडोरा, पाणी जाण्यायेण्याचे मार्ग व हक्क, वहिवाटीचे व इजमेंटचे मार्ग व हक्क वगैरे तद्ंगभूत सर्व वस्तू, हक्क, हितसंबंध यासुद्धा.

वर वर्णन केलेल्या मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, कबजा, लिज, कुळवहिवाट, बोजा, ताबा, इजमेंट, साठेकरार लिएन अगर अन्य कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह तसे लेखी कळवावे. सदर मुदतीत आमचेकडे कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल फरोक्ताचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर मागाहून उपस्थित केलेली कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : ०४/११/२०२४.

सही/-
**श्री. प्रसन्न चंद्रकांत शिंदे.**
बी.ए.एलएल.बी.ॲडव्होकेट
७५, अभिराज, मु. भिसेगांव,
पो. गुंडगे ता. कर्जत, जि. रायगड.

# पळस्पे फाटा येथे साडेतीन लाखांची रोकड जप्त



। पनवेल । वार्ताहर ।

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १५ ऑक्टोबरपासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. पनवेल विधानसभा मतदारसंघ, निवडणूक विभाग अंतर्गत आचारसंहिता पथकांतर्गत भरारी पथक क्र.०१ (एफएसटी- पथक) ने सोमवारी (दि. ५) बेकायदेशीर रोकड, अन्य संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे, बाहन तपासण्याचे कर्तव्य करत असताना सकाळी साधारणतः ९.५५ वाजण्याचे दरम्यान मुंबई-गोवा महामार्गावरील पळस्पे फाटा चेक नाका येथे रोडवरुन जाणाऱ्या सुपर कॅरी टेम्पो सिल्व्हर रंगाची चार चाकी गाडीला थांबवून तपासणी केली असता त्या गाडीमध्ये २,४९,५०० रोख रक्कम आढळून आली.

ही कारवाई पनवेल विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विजय पाटील, आचारसंहिता पथक प्रमुख भारत राठोड, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, संदिप कराड, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, संजय भालेराव, सहाय्यक खर्च निरिक्षक, विजय फासे, सहाय्यक खर्च निरिक्षक, संजय आपटे, आचारसंहिता पथक प्रमुख महेश पांढरे, आचार संनियंत्रण अधिकारी, शरद गिते, आचारसंहिता पथक सहाय्यक प्रमुख जी.एस.बहिरम, सहा.समन्वयक आचारसंहिता कक्ष, दिनेश भोसले, तुषार म्हात्रे, नितेश चिमणे, आशा डोळस, तसेच भरारी पथक क्र. -१ पथकाचे प्रमुख लक्ष्मण जाधव, सहा.पथक प्रमुख, सचिन पवार, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दौलराव माने, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पो.ह. राम म्हात्रे, कामोठे पोलीस ठाण्याचे पो.शि. गणपती पाटील, खारघर पोलीस ठाण्याचे भूषण चौधरी उपस्थित होते.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशील श्री. जनार्दन बाळाराम वालेकर यांनी खाली वर्णन केलेली भात जमीन मिळकत विकण्याचे ठरवले आहे. सदर मिळकत मौजे बेलोशी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे आहे.

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| बेलोशी, तालुका अलिबाग,जिल्हा रायगड | ३७७ | ०-१२-७० <br> पो.ख. ०-०१-०० <br> एकूण ०-१३-७० | २-५६, <br> भोगवटादार <br> वर्ग -१ |

सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही, कसल्याही प्रकारचे करारपत्र वगैरे दस्तांच्या आधारे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आंत कागदोपत्री पुराव्यासह आपली लेखी हरकत खाली सही करणार यांच्याकडे दाखल करावी. उक्त मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास आमचे अशील सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून मिळकत विक्री, हस्तांतरीत करतील व मागाहून कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत आमच्या अशीलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०५-११-२०२४.

**(ॲड. विकास हरिश्चंद्र पाटील)**
‘‘युगंधर सोसा, शॉप नं.०६, युनियन बँकेशेजारी, ब्राह्मण आळी, अलिबाग,
जिल्हा - रायगड.
मो- ७७९८८४४४३३

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णनः. १. मौजे - आडीठाकुर, २. मौजे - रोहिनीकोंड आणि ३. मौजे - तुरुंबवाडी ता. म्हसळा, जि.रायगड, तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका म्हसळा रायगड जिल्हा परिषद येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकतीन पैकी श्री अशोक केरु पोतदार यांचा हिस्साची मिळकत.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**

**१. मौजे-आडीठाकुर, ता.म्हसळा, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत.**

| अ.क्रं. | भुमापन क्रं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| १ | ५० | ०-४२-७० | ८.८१ |

**२. मौजे-रोहिनीकोंड, ता.म्हसळा, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत.**

| अ.क्रं. | भुमापन क्रं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| १ | ६६ | ०-४६-०० | १.८० |
| २ | ६७ | २-५७-०० | १०.०१ |

**३. मौजे-तुरुंबवाडी, ता. म्हसळा, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत.**

| अ.क्रं. | भुमापन क्रं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| १ | १४९ | ४-२१-०० | १.२६ |
| २ | १४५ | ०-२१-०० | ०.०६ |
| ३ | १५५ | ०-११-१० | ०.८७ |
| ४ | १५० | ०-०३-०० | ०.२० |
| ५ | १५३ | ०-१४-०० | ०.०६ |
| ६ | १५७ | ०-२२-०० | ०.०९ |
| ७ | १६२ | ०-२६-५० | ०.२७ |
| ८ | १४८ | ०-६३-०० | ०.२० |
| ९ | १५९ | ०-४९-०० | ०.६२ |

वर नमुद कलेली मिळकत ही वरील कबजेदाराच्या मालकी हक्कांत व कबजे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत पैकी आमचे अशिलांना त्यांचा हिस्सा कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबद्दल विद्यमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणचाही, कोणताही कसलाही कुळ वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनविठी, साठेकरार, खरेदीखत, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण : म्हसळा
दिनांक : ०५/११/२०२४

**ॲड. प्रगती दिपक पोतदार**
मो. ७८७५९१४९५० फोन नं. ०२१४७-२२२०१०
पत्ता : श्री सोमजाई मंदिरासमोर, टिळक रोड,
दिपक इंजि.वर्क्स, मु.पो. ता.श्रीवर्धन, जि.रायगड. पिन ४०२ ११०.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी विद्यमान मालकांच्या मालकी वहीवाटीची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे चिवे आणि भिलपाडा, ता. सुधागड, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती त्यांचेकडुन आमचे अशिलांनी जमिनीची अदलाबदली करण्याचे अथवा मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतींचे वर्णन**

**मौजे चिवे, ता. सुधागड, जि.रायगड येथील**

| जमिन मालकांचे नाव | सर्व्हे नं. | एकुण हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| सदानंद लक्ष्मणराव पाटील | ६२/९ | ०-०६.०० | ०.०३ |
| | ६२/१०/ब | ०-१०.०० | ०.३० |
| | ६६/१ | ०-३५.९० | ५.०६ |
| गजानन उत्तमराव मान्टे <br> सदानंद लक्ष्मणराव पाटील | २२/१३ | ०-९७.०० | ०.१२ |
| गजानन उत्तमराव मान्टे | ६०/१ | ०-२५.०० | ०.१६ |

**जमिन मिळकतींचे वर्णन**

**मौजे-भिलपाडा, ता. सुधागड, जि.- रायगड येथील**

| जमिन मालकांचे नाव | सर्व्हे नं. | एकुण हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| गजानन उत्तमराव मान्टे | ६४/१ | ०-०८.०० | ०.०३ |
| | ६५/२/ब | ०-२५.३० | ३.५४ |

त्याअर्थी सदर मिळकतींमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस फरोक्त करारनामा, एम.ओ.यू. हुकुमनामा मनाई आदेश जप्ती, वहिवाट हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर करावयात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालकांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत हे सर्व जाहीर व्हावे

पाली
दिनांक : ०५/११/२०२४

**श्री. नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
पत्ता- मु. पो. पाली भोईआळी,
ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५
मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी विद्यमान मालकांच्या मालकी वहीवाटीची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे चिवे आणि भिलपाडा ता. सुधागड, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती त्यांचेकडुन आमचे अशिलांनी जमिनीची अदलाबदली करण्याचे अथवा मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतींचे वर्णन**

**मौजे चिवे, ता. सुधागड, जि.रायगड येथील**

| जमिन मालकांचे नाव | सर्व्हे नं. | एकुण हे.आर. चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| बिना प्रशांत लाड | ५८/१ | १-३२.०० | ०.२५ |
| | ६०/२ | ०-७३.१० | २.९३ |
| | ६२/१०/अ | ०-३६.०० | ०.१० |
| | ६२/१४ | ०-४६.०० | ०.१२ |
| | ६६/२/ब | ०-२९.१० | ४.८७ |
| रचना संजय तलाठी | ६३/१ | ०-१५.४० | ०.८१ |
| बिना प्रशांत लाड | ६४/१४ | ०-०३.५० | ०.०३ |
| | ६५/५ | ०-३६.४० | ७.४८ |
| हृदय उर्फ कृष्णा प्रशांत लाड | ६६/२/अ | ०-५८.२० | ९.७६ |
| प्रशांत शांताराम लाड | ५९ | ०-४९.६० | ३.१२ |
| | ६१/३ | ०-२३.३० | ०.५३ |
| | ६२/११ | ०-१३.०० | ०.०५ |
| | ६२/१२ | ०-१९.०० | ०.०७ |
| | ६५/३ | ०-२१.२० | १.५६ |
| | ६६/३ | ०-६१.०० | १२.०० |
| | ६७/३ | ०-२१.०० | २.९१ |

**जमिन मिळकतींचे वर्णन**

**मौजे-भिलपाडा, ता.सुधागड, जि. रायगड येथील**

| जमिन मालकांचे नाव | सर्व्हे नं. | एकुण हे.-आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| प्रशांत शांताराम लाड | ६५/२/अ | ०-२५.३० | ३.५५ |
| | ६६ | ०-३४.०० | ०.१२ |

त्याअर्थी सदर मिळकतींमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण,दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर करावयात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालकांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : ०५/११/२०२४.

**श्री. नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
पत्ता- मु. पो. पाली भोईआळी,
ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५
मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. दिलीप बाबु साटपे व श्री. जितेंद्र बाळकृष्ण निचिते यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे शेलू, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि. नं. | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| वेणुबाई धर्मा गवळी, <br> ताईबाई धर्मा गवळी, <br> चांगुणाबाई लक्ष्मण मसणे, <br> गुलाब शंकर मसणे, <br> हर्षदा शंकर मसणे, | ७८/१ | ००-२६-८० <br> पो.ख. ००-०१-५० <br> एकुण ००-२८-३० | १-७६ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०५/११/२०२४

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण, निर्माण नगरी,
नेरळ,ता. कर्जत, जि. रायगड.मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. दिपक कृष्णा भोईर रा. ०५, वाडीया बंगळा, जुना मुंबई पुणे हायवे, जवळ आयसीआयसीआय गेस्ट हाऊस, खंडाळा, मावळ, पुणे ४१०३०१. यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांन बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे - चांधई, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे. | क्षेत्र आर. | क्षेत्र पॉ | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| ८५ | २ | ० | ६७ | ८० | ६ | ३१ |

या मिळकतीपैकी लिहून देणार यांचे हिश्याचे क्षेत्र हे. आर. पॉ. ०.३१.८० आकार रु. पै. ३.०४ अशी जमीन मिळकत

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही /-
**ॲड. निलेश दामु मुंढे**
दिनांक:-०६/११/२०२४
मो. नं. ८४४६८६९६७१७७

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, चौथा मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
ई मेल: adv.nileshmundhe029@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे मुळगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक बंडु बबन तुरडे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १० | १/ब | एकुण क्षेत्र १-३५-९० पैकी विकत देणार यांचे मालकीचे विकत दिलेले क्षेत्र ०-४०-०० <br> पो.ख. ०-०५-०० <br> ०-४५-०० पैकी विकत दिलेले क्षेत्र. ०-१५-०० <br> पो.ख. ०-०५-०० <br> ०-२०-०० | ३-४९ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०६/११/२०२४

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-गाळा नं.०९,कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे मुळगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक मनोहर देहु देशमुख यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १० | १/ब | एकुण क्षेत्र १-३५-९० पैकी विकत देणार यांचे मालकीचे विकत दिलेले क्षेत्र ०-२०-२५ <br> पो.ख.०-०२-७० <br> एकुण क्षेत्र ०-२२-९५ | १-७६ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०६/११/२०२४

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

# आता नजर बॉर्डर-गावस्कर मालिकेवर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था । टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर भारतीय संघाला जागितक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या जेतेपदाची स्वप्न पडू लागली होती. मागील दोन पर्वात भारताला उप विजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. यामुळेच रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या जेतेपदाचा दुष्काळ यंदा संपेल, असे वाटत होते. परंतु, न्यूझीलंडविरुद्धच्या ३-० अशा पराभवाने सर्व गणित बिघडले आहे. आता भारताला अगामी मालिकेत ऑस्ट्रेलियाला ४-० असे पराभूत करावे लागणार आहे, तरच भारत डब्लूटीसीचा अंतिम सामना खेळू शकणार आहे. यामुळे आता बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.**

रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने घरच्या मैदानावर बांगलादेशला व्हाईट वॉश दिला आणि कसोटी गुणतालिकेत अव्वल स्थान बळकट केले होते. पण, न्यूझीलंडविरुद्धच्या ३-० अशा पराभवाने भारताला ७४ हून थेट ५८.३३ टक्क्यांवर यावे लागले. यावेळी भारत प्रथमच घरच्या मैदानावर मालिका हरला आहे. यामुळे आता भारताला ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीत ४-० असा विजय मिळवावा लागणार आहे.

## भारतीय संघांच्या आशा पल्लवित



भारताने बॉर्डर गावस्कर मालिका २-३ अशी गमावल्यानंतरही त्यांचे जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा खेळण्याचा मार्ग खुला राहणार आहे. भारताने ही मालिका २-३ अशी गमावल्यास त्यांची टक्केवारी ५३.५१ अशी राहिल. यानंतरही ते दुसऱ्या स्थानावर कायम राहतील. अशा वेळी त्यांना अन्य संघांच्या कामगिरीवर अवलंबून रहावे लागणार आहे.

बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखालील इंग्लंडचा संघ पुढील महिन्यात न्यूझीलंड दौऱ्यावर आहे. इंग्लंड-न्यूझीलंड मालिका १-१ अशी बरोबरीत सुटली तरी भारताचाच फायदा आहे. या निकालमुळे न्यूझीलंड जास्तीत जास्त ५२.३८ टक्क्यांपर्यंत पोहोचू शकतो. दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंका यांच्यातली दोन सामन्यांची मालिका १-१ अशी बरोबरीत सुटल्यासही भारताला फायदा होणार आहे. श्रीलंका (५५.५६) आणि आफ्रिका (५४.१७) हेही अंतिम सामन्याच्या शर्यतीत आहेत. पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातली दोन सामन्यांची मालिका १-१ अशी बरोबरीत सुटणेही भारतासाठी महत्त्वाचे आहे.

तसेच, बॉर्डर गावस्कर चषकानंतर ऑस्ट्रेलियाचा संघ श्रीलंका दौऱ्यावर जाणार आहे. भारताला जर अंतिम सामना खेळायचा असेल तर ही मालिका ०-० अशी अनिर्णीत राहणे गरजेचे आहे. जरी ऑस्ट्रेलियाने ही मालिका जिंकली तरी भारत अंतिम सामना खेळू शकतो.

# रोहित शर्माने निवृत्ती घ्यावी : श्रीकांत

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारत विरूद्ध न्यूझीलंड संघात नुकतीच ३ सामन्यांची कसोटी मालिका खेळली गेली. या मालिकेत न्यूझीलंडने रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचा ३-० ने दारूण पराभव केला. यावेळी भारताचे दिग्गज खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा दोघंही या मालिकेत पूर्णपणे फ्लॉप ठरले आहेत.



दरम्यान, आता या दोन्ही दिग्गजांबद्दल भारताचा माजी दिग्गज खेळाडू क्रिस श्रीकांतने मोठे वक्तव्य केले आहे.

क्रिस श्रीकांतने सांगितले की, जर रोहित शर्मा ऑस्ट्रेलियात चांगली कामगिरी करत नसेल तर त्याने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घ्यावी. श्रीकांत पुढे म्हणाले की, आता प्रत्येकजण असा विचार करू लागला आहे की जर रोहित शर्मा ऑस्ट्रेलियात चांगली कामगिरी करू शकला नाही तर तो कदाचित कसोटी क्रिकेटला अलविदा करेल. रोहितने आधीच टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे आणि कसोटी क्रिकेट सोडल्यानंतर तो फक्त एकदिवसीय क्रिकेट खेळेल. पण एकदिवसीय क्रिकेटमध्ये तो आता जुन्या खेळाडूंमध्ये नाही, हेही लक्षात ठेवावे लागेल.

# पुण्याचा गुजरातवर दणदणीत विजय




**। गचीबोवली । वृत्तसंस्था ।**

प्रो-कबड्डी लीगमध्ये पुणेरी पलटण संघाने गुजरात जायंट्सला ४९-३० असे १९ गुणांनी पराभूत करताना सलग दुसऱ्या विजयाची नोंद केली. याआधी रविवारी झालेल्या लढतीमध्ये पुणेरी पलटण संघाने यु मुम्बाला ३५-२८ असे पराभूत केले होते.

हैदराबाद येथील गचीबोवली येथील मैदानावर झालेल्या लढतीमध्ये मध्यंतरालाच पुणेरी पलटण संघाने ३०-९ अशी २१ गुणांची आघाडी घेतली होती. आकाश शिंदेने ११ गुणांसह आपले 'सुपर १०' पूर्ण केले. त्याला पंकज मोहितेने ८ गुणांसह सुरेख साथ दिली. गुजरात जायंट्स संघाकडून गुमान सिंगने १२ गुण मिळविताना सुपर १० पूर्ण केले. मात्र, तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही.

तत्पूर्वी रविवारी उशीरा झालेल्या लढतीमध्ये बंगाल वॉरियर्सने हरियाणा स्टीलर्स संघाला अटीतटीच्या लढतीत ४०-३८ असे २ गुणांनी पराभूत केले. मध्यंतराला दोन्ही संघांनी १९-१९ अशी बरोबरी केली होती. बंगाल संघाकडून मणिंदरने (१२) तर हरियाणा संघाकडून विनयने 'सुपर १०' पूर्ण केले. मणिंदरला मयूर कदम, प्रवीण ठाकूर व सुशील कांब्रेकर व फझल अत्राचलीने प्रत्येकी ४ गुण मिळविताना सुरेख साथ दिली. हरियाणा स्टीलर्सकडून मोहम्मदरेझा शदलोईने ९ तर नवदीपने ६ गुणांची कमाई केली.

## हरमनप्रीत कौरची मोठी झेप

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयसीसीने मंगळवारी (दि.५) महिलांची एकदिवसीय क्रमवारी जाहीर केली आहे. या क्रमवारीत भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर नवव्या स्थानावर पोहोचली आहे. तसेच, सलामीची फलंदाज स्मृती मानधना चौथ्या स्थानावर कायम आहे. नुकताच न्यूझीलंडच्या महिला संघाने भारताचा दौरा केला. या कालावधीत, दोन्ही संघांमध्ये ३ एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळली गेली. हरमनप्रीत कौरने मालिकेतील पहिल्या एकदिवसीय सामन्यात नाबाद ५४ धावा आणि दुसऱ्या सामन्यात २४ धावा केल्या. यानंतर तीची क्रमवारीत तीन स्थानाची घसरली झाली होती. मात्र, शेवटच्या एकदिवसीय सामन्यात तिने ६३ चेंडूत ५९ धावांची नाबाद खेळीमुळे ती पुन्हा टॉप-१० मध्ये आली आहे.

# कर्णधार रिझवानचा पहिला पराभव

**। सिडनी । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तानचा संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. पाकिस्तानला पहिल्याच सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून २ गडी राखून पराभव स्वीकारावा लागला. हा सामना खूपच रोमांचक झाला होता. मोहम्मद रिझवानच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानचा हा एकदिवसीय सामन्यातील पहिलाच पराभव आहे.



ऑस्ट्रेलियन कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजीला आलेल्या पाकिस्तान संघाला तिसऱ्याच षटकात सॅम अयुबच्या (१) रूपाने पहिला धक्का बसला. दुसरा फलंदाज शफीक (२६) देखील जास्त वेळ टिकू शकला नाही. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या बाबर आझमने कर्णधार मोहम्मद रिझवानसोबत मोठी भागीदारी रचण्याचा प्रयत्न केला, मात्र तोही अपयशी ठरला. बाबर ३७ धावा करून बाद झाला. रिझवानने कर्णधारपदाची खेळी खेळताना ७१ चेंडूत ४४ धावा केल्या. यानंतर नसीम शाहने ४० धावांची खेळी केली. शाहीन आफ्रिदीनेही २२ धावा केल्या. यामुळे पाकिस्तानचा संघ ४६.३ षटकात २०३ धावांपर्यंत मजल मारू शकला.

प्रत्युत्तरात २०४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघाची सुरुवात खराब झाली. सलामीवीर मॅथ्यू शॉर्ट आणि जेक फ्रेझर मॅकगर्क यांनी २८ धावसंख्येवर आपल्या विकेट गमावल्या. यानंतर, स्टीव्ह स्मिथ आणि जोश इंग्लिश यांच्या ८५ धावांच्या भागीदारीमुळे सामना ऑस्ट्रेलियाच्या बाजूने गेला. यानंतर कमिन्सने ३२ धावांची नाबाद कर्णधार खेळी खेळून संघाचा २ गडी राखून विजय निश्चित केला. त्याच्याशिवाय जोश इंग्लिशने ४९ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले.

## मेगा लिलावाची प्रतिक्षा संपली

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२५ चा मेगा लिलाव कधी आणि कुठे होणार हे जाणून घेण्यासाठी चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. आता चाहत्यांची प्रतीक्षा संपणार असल्याचे दिसत आहे. वास्तविक, आयपीएल २०२५ च्या मेगा लिलावाची संभाव्य तारीख आणि ठिकाण यासंदर्भात मोठी बातमी समोर आली आहे. आयपीएल २०२५ चा मेगा लिलाव नोव्हेंबरच्या अखेरीस रियाधमध्ये होऊ शकतो. या मेगा लिलावापूर्वी सर्व १० फ्रँचायझींनी त्यांच्या रिटेन खेळाडूंची यादी जाहीर केली आहे. मेगा लिलावापूर्वी एकूण ४६ खेळाडूंना कायम ठेवण्यात आले आहे.

आयपीएलचा मेगा लिलाव रियाधमध्ये २४ ते २५ नोव्हेंबर या कालावधीत होण्याची शक्यता आहे. या मेगा लिलावात पंजाब किंग्स संघाकडे सर्वात मोठी पर्स असेल. पंजाबने केवळ दोन अनकॅप्ड खेळाडू प्रभसिमरन सिंग आणि शशांक सिंग यांना कायम ठेवले आहेत. अशा परिस्थितीत संघ लिलावात मोठा पैसा खर्च करू शकतो. तसेच, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील मोठे नाव असलेले जोस बटलर, केएल राहुल, श्रेयस अय्यर, ग्लेन मॅक्सवेल आणि रिषभ पंत यांच्यासह अनेक मोठे खेळाडू आपापल्या संघाकडून रिलीज केले गेले आहेत. यामुळे सर्व फ्रँचायझी या खेळाडूंवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यास तयार असतील. याव्यतिरिक्त काही अनकॅप्ड भारतीय खेळाडूंवर देखील मोठा पैसा खर्च केला जाऊ शकतो.

काही दिवसांपूर्वी रिटेन केलेल्या खेळाडूंमध्ये सनरायझर्स हैदराबाद संघाने हेन्रिक क्लासेन याच्यावर सर्वाधिक २३ कोटी रुपये खर्च केले. तर, विराट कोहली याला आरसीबीने व निकोलस पूरन याला लखनऊने २१ कोटी रुपये देत आपल्या संघात कायम ठेवले. याव्यतिरिक्त बऱ्याच संघांनी आपल्या पहिल्या रिटेन खेळाडूला १८ कोटी रुपये दिले. भारताचा व चेन्नईचा माजी कर्णधार एमएस धोनी याला अनकॅप्ड खेळाडू घोषित करत चेन्नईने केवळ चार कोटींमध्ये कायम ठेवले.

## डी. गुकेशची माघार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा अव्वल मानांकित अर्जुन इरिगसी देशबांधव विदित गुजरातीचा सामना करणार आहे. या स्पर्धेच्या पहिल्या फेरीत अरविंद चिदंबरमचा सामना इराणच्या अमीन तबाताबेशी, व्हॅचियर लाग्राव्ह मॅक्झिमचा सामना मघसूदलू परम तर अमेरिकेचा लेव्हॉन अरोनियनचा सामना ॲलेक्सी शिरोव्हशी होणार आहे. गतवेळचा चॅम्पियन डी. गुकेश चीनच्या डिंग लिरेन विरुद्धच्या जागतिक अजिंक्यपद सामन्यासाठी तयारी करत असल्याने तो यंदाच्या स्पर्धेत सहभागी होणार नाही.

# केएल राहुल, ध्रुव जुरेलला संधी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाचा ऑस्ट्रेलिया दौरा २२ नोव्हेंबरपासून सुरू होत आहे. जिथे दोन्ही संघ पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील बॉर्डर-गावसकर ट्रॉफी खेळतील. यासाठी केएल राहुल आणि ध्रुव जुरेल यांचाही भारतीय संघात समावेश आहे.



न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारतीय संघाला व्हाईटवॉश मिळाला. हा पराभव जिव्हारी लागण्याचे कारण म्हणजे, भारतीय संघ आपल्या घरच्या मैदानावर ही मालिका खेळत होता. आता भारतीय संघाचा ऑस्ट्रेलिया दौरा २२ नोव्हेंबरपासून सुरू होत आहे. जिथे दोन्ही संघ पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील बॉर्डर-गावसकर ट्रॉफी खेळतील. यासाठी केएल राहुल आणि ध्रुव जुरेल यांचाही भारतीय संघात समावेश आहे. या मालिकेच्या आधी राहुल आणि जुरेल यांना एक विशेष संधी मिळणार आहे. या दोघांचाही भारत 'अ' संघात समावेश झाला असून, बॉर्डर-गावसकर मालिकेआधी यांच्याकडे सरावाची चांगली संधी असेल.

भारतीय संघाचा फलंदाज केएल राहुल आणि युवा यष्टीरक्षक ध्रुव जुरेल यांना बॉर्डर-गावसकर मालिकेपूर्वी सराव करण्याची महत्त्वाची संधी मिळणार आहे. बीसीसीआयने आगामी ऑस्ट्रेलिया दौऱ्यात दोन्ही खेळाडूंचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

# महिला बॉक्सर इमान पुरुषचं

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

वादग्रस्त अल्जेरियन बॉक्सर इमान खलीफने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये सुवर्णपदक जिंकले होते. अल्जेरियन बॉक्सरने महिला गटात सुवर्णपदक जिंकले होते. ऑलिम्पिकदरम्यान इमानच्या लिंगावरून वाद झाला होता. आता याबाबत मोठे अपडेट समोर आले आहे. जे की खरोखरचं धक्कादायक आहेत. ज्यामध्ये इमानच्या आत अनेक पुरुषांचे अवयव असल्याचे सांगण्यात आले आहे.



वैद्यकीय अहवालात, खलिफामध्ये अंतर्गत अंडकोष आणि गुणसूत्र आहेत. जे ५-अल्फा रिडक्टेस अपुरेपणा नावाचे विकार दर्शवतात. असा धक्कादायक रिपोर्ट फ्रेंच पत्रकार जाफर ऐत औडिया यांनी समोर आणले आहे.

ऑलिम्पिक दरम्यान, इमान खलीफ विरुद्ध खेळलेल्या अनेक महिला बॉक्सर्सनी इमानमध्ये क्रोमोसोम असल्याचे हावभावांद्वारे अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला होता.

# भारत पाकिस्तान संघाचे खेळाडू एकत्र खेळणार

**। केप टाऊन । वृत्तसंस्था ।**

आफ्रिका आणि आशिया यांच्यातील आफ्रो-आशिया चषक स्पर्धा पुन्हा सुरू होणार असल्याची बातमी समोर येत आहे. शनिवारी आफ्रिका क्रिकेट असोसीएशनच्या सदस्यांची वार्षिक सभा झाली. या सभेमध्ये आगामी आफ्रो-आशिया कपच्या आयोजनासाठी ६ सदस्यांची प्रभारी समिती नेमण्यात आली आहे. आशियाई क्रिकेट परिषद सारख्या इतर संस्थांपर्यंत पोहोचणे आणि दोन्ही खंडातील खेळाडूंना स्पर्धात्मक संधी मिळण्यासाठी आफ्रो-आशिया चषक सारख्या स्पर्धांचे नियोजन करणे, हे या समितीची उदिष्ट आहे.

२००५ मध्ये दक्षिण आफ्रिकेत आणि २००७ मध्ये भारतात, फक्त दोनवेळा या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. २००९ मध्येही केनियामध्ये या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, परंतु त्यावेळी ही स्पर्धा होऊ शकली नाही. ही स्पर्धा पुन्हा सुरू झाल्यास तब्बल १७ वर्षांनंतर भारत-पाकिस्तान संघातील खेळाडू एका संघामधून खेळतील. तसेच, आफ्रो-आशिया चषकामुळे आफ्रिका क्रिकेट असोसीएशन आणि आशियाई क्रिकेट परिषद या दोन्ही संस्थेंना आर्थिक फायदा होतो. एसीयेचे प्रभारी अध्यक्ष तवेंगवा मुकुहलानी, जे झिम्बाब्वे क्रिकेटचे देखील अध्यक्ष आहेत त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, आम्ही आफ्रिका क्रिकेट असोसीएशन सोबतच आशियाई क्रिकेट परिषदेशीही संवाद साधला. त्यांचीही आफ्रो-आशिया चषक स्पर्धा पुन्हा सुरू करण्याची इच्छा आहे.



### चारशेहून अधिक सामने खेळविण्याचा आयसीसीचा मानस

# महिला क्रिकेटची रुपरेखा जाहीर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था । आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने सोमवारी (दि.४) २०२५ ते २०२९ या चार वर्षांसाठी महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटची साधारण रुपरेषा काय असेल, हे जाहीर केले आहे. आयसीसीने २०२५-२०२९ साली फ्यूचर टूर्स प्रोग्राम घोषित केला असून यात आयसीसी महिला चॅम्पियनशीपच्या चौथ्या पर्वाचाही समावेश आहे.**



गेल्या काही काळापासून एकदिवसीय प्रकारत आयसीसी महिला अजिंक्यपद स्पर्धा खेळवत आहे. यानुसार दर चार वर्षांनी होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक पात्रता ठरवण्यात येते. दरम्यान, आता चौथ्या पर्वातून २०२९ म हिला एकदिवसीय विश्वचषकासाठी पात्रता ठरवण्यात येणार आहे. यंदाच्या पर्वात ११ संघ सहभागी होत आहेत. आत्तापर्यंत १० संघात महिला अजिंक्यपद स्पर्धा खेळवली जात होती. पण आता चौथ्या पर्वातून झिम्बाब्वेचा महिला संघ या स्पर्धेत पदार्पण करत आहे.

या स्पर्धेत भारतीय संघ इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश आणि झिम्बाब्वे या संघाविरुद्ध मायदेशात मालिका खेळणार आहे. तसेच न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज आणि आयर्लंड यांच्याविरुद्ध त्यांच्या देशात जाऊन मालिका खेळायच्या आहेत. याशिवाय फ्यूचर टूर्स प्रोग्राम २०२५-२०२९ नुसार महिला क्रिकेटमध्ये ४०० हून अधिक आंतरराष्ट्रीय सामने चार वर्षात खेळवले जाणार आहेत. याचबरोबर प्रत्येकवर्षी आयसीसी स्पर्धा होणार आहेत.

२०२५ मध्ये महिला एकदिवसीय विश्वचषक होणार आहे. यानंतर २०२६ मध्ये महिला टी-२० विश्वचषक खेळवला जाणार आहे. २०२७ मध्ये महिला अजिंक्यपद चषक स्पर्धा खेळवली जाईल, तर २०२८ मध्ये महिला टी-२० विश्वचषक खेळवला जाणार आहे.

दरम्यान, आयसीसीच्या स्पर्धांपूर्वी देशांचे बोर्ड परस्पर संमतीने तिरंगी मालिकाही खेळवणार आहेत. टी-२० विश्वचषक २०२६ पूर्वी भारत आणि न्यूझीलंड इंग्लंड दौरा करणार असून या तीन संघात टी-२० मालिका होईल. तसेच, पाकिस्तान आणि वेस्ट इंडिज आयर्लंडमध्ये तिरंगी मालिका खेळणार आहेत. २०२७ आणि २०२८ मध्ये अनुक्रमे श्रीलंका आणि वेस्ट इंडिज येथे तिरंगी मालिका होणार आहेत. याशिवाय येत्या ४ वर्षात ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, भारत, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज अशा संघासोबतही अनेक संघ कसोटी सामने खेळताना दिसणार आहेत.

# भारत यजमानपदासाठी इच्छूक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनने २०३६ च्या ऑलिम्पिक यजमानपदासाठी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीकडे इच्छा व्यक्त केली. मिळालेल्या माहितीनुसार, २०३६ मध्ये ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिक खेळांचे आयोजन करण्याची भारताची इच्छा आहे, असे पत्र १ ऑक्टोबर २०२४ रोजी ऑलिम्पिक समितीला पाठवण्यात आले आहे. भारत सरकारला आशा आहे की, २०३६ च्या ऑलिम्पिकचे आयोजन करण्याची संधी भारताला मिळेल आणि यामुळे संपूर्ण देशामध्ये आर्थिक वाढ, सामाजिक प्रगती आणि युवा सक्षमीकरणासाठी फायदा होईल.




आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या वार्षिक सभेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २०३६ उन्हाळी ऑलिम्पिकच्या आयोजनासाठी भारत इच्छूक असल्याचे सांगितले.

भारत ऑलिम्पिक आयोजित करण्यासाठी खूप उत्सुक आहे. २०३६ ऑलिम्पिक आयोजित करण्याच्या प्रयत्नांममध्ये भारत कोणतीही कसर सोडणार नाही. हे १४० कोटी भारतीयांचे स्वप्न आहे आणि आयओसीच्या पाठिंब्याने आम्हाला हे स्वप्न पूर्ण करायचे आहे. खेळ हा केवळ पदके जिंकण्यासाठी नसून मन जिंकण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. खेळ चॅम्पियन्ससोबतच आनंदही देतो. असे मोदी म्हणाले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)